❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews



सत्याचा विजय, असत्याचा
नाश आणि सदाचाराचा सन्मान
करणारा मंगलमय सण
विजयादशमी व दसऱ्याच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



सुट्टीची सुचना

आज मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी "दसरा व विजयादशमी निमित्त" दै. संध्या कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

- संपादिका

टाइगर श्रॉफच्या मारेकऱ्यांना अटक

गोळीबार प्रकरण

■ मुंबई (दै. संध्या)

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली असून त्यांना राजस्थानच्या कोटा शहरातून मुंबईत आणण्यात येत आहे. त्यानंतर, पोलीस उपायुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. काल जुहूमध्ये अभिनेता टायगर श्रॉफ यांच्या कारवर गोळीबाराची घटना घडली, दुचाकीवरुन आलेल्या तिघांपैकी दोघांनी फायरिंग केले आणि ते घटनास्थळावरुन पळून गेले. या आरोपींची बाईक आम्हाला अंधेरी रेल्वे स्थानकावर मिळाली. त्यानंतर, आम्ही पुढे फॉलोअप करत गेलो, आणि पुणे-जयपूर एक्सप्रेसने ते पुढे गेले. आम्ही माहिती काढून, ते कोणत्या बोगीत आहेत, याची माहिती जयपूर पोलिसांना दिली. त्यानंतर, आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त राज तिलक रोशन यांनी दिली.

बिश्नोई गँगच्या ऑडिओबद्दलही पोलीस उपायुक्तांनी दिली माहिती



मुंबईतून पळून गेलेल्या आरोपींच्या मागे आमची टीम होती, आमची टीम त्यांच्यापर्यंत पोहचली आणि ताब्यातही घेतले, हा तपास सुरूच आहे, हे खंडणीप्रकरण आहे. तसेच, हत्येच्या प्रयत्नाचा देखील गुन्हा आहे. याप्रकरणी, आम्ही कारवाई करत असून आरोपींकडे दोन वेपन होते, त्यातून 5-6 फायर झाले आहेत. आम्ही आरोपींना ताब्यात घेतले असून सध्या कोर्टाची प्रोसेस सुरू आहे. आता, फक्त प्राईमा इंट्रोगेशन सुरूच आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त राजतिलक रोशन यांनी दिली.

सध्या व्हायरल ऑडिओ क्लीप आणि त्या पोस्ट फिरत आहेत, त्याचं व्हेरिफिकेशन बाकी आहे , एकदा ते व्हेरीफाय झालं की मगच सांगता येईल. मागच्या केसेसमध्ये MCOCA झालेली आहे, असे म्हणत बिश्नोई गँगबाबत पोलिसांनी प्रतिक्रिया दिली.

दोन आरोपींची पहिल्यापासूनच ओळख

गोळीबाराच्या घटनेतील दोन आरोपी बिहारमधील सोनीपतचे असून एक बिहारचा आहे. त्यापैकी, एकाचे शिक्षण बारावी तर एकाचे आठवी शिक्षण आहे. दोन आरोपी एकमेकांना ओळखत होते, तिसरा आरोपी त्यांच्या संपर्कात कसा आला याची चौकशी आम्ही करू, असे पोलिसांनी म्हटले. या घटनेत 5 राउंड फायर झाले आहेत, टायगर श्रॉफची कधी तक्रार नव्हती. सेलेब्रिटींच्या सुरक्षेसाठी SOP आहे, त्याप्रमाणे दिली जात आहे.

थोडक्यात...

शेतकऱ्यांसाठी एकनाथ शिंदेंचा मोठा निर्णय

मुंबई : दैनिक संध्या

दसऱ्यासाठी मुंबईमध्ये शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून मोठी तयारी सुरु असते. शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना उबाठा गट यांचे दसरा मेळावे हे राज्यामध्ये प्रचंड गाजतात. या मेळाव्यातून दोन्ही पक्ष त्यांच्या पुढील भूमिका जाहीर करतात. मुख्य नेत्यांची भाषणं ही या मेळाव्याचे मुख्य आकर्षण असते. एकीकडे उद्धव ठाकरेंचा ठाकरी बाणा तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचे करारी भाषण या दोन्हीची शिवसैनिकांना ओढ असते. पण यंदा शिंदेंच्या शिवसनेने त्यांच्या दसरा मेळाव्यामध्ये मोठा बदल केला आहे. नेस्को सेंटरमध्ये होणाऱ्या शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यात यंदा सांस्कृतिक कार्यक्रम होणार नाहीत. दरवर्षी सेलिब्रिटींचे परफॉर्मन्स ठेवले जातात. मात्र यंदा ते रद्द करण्यात आले आहेत. यावेळी थेट भाषण होणार असून, अवघ्या 2 ते अडीच तासांत मेळावा संपवला जाणार आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही शिवसेनेतर्फे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मदत पाठवली जाणार आहे.

प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात मोठा खुलासा

मुंबई : दैनिक संध्या

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे ठाण्यातील शाखाप्रमुख आणि विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या जुन्या वैमनस्यातून पूर्णेकर यांची हत्या केल्याचा जबाब आरोपींनी उत्तर प्रदेश स्पेशल टास्क फोर्सच्या (एसटीएफ) चौकशीदरम्यान दिल्याचा दावा त्यांच्या कुटुंबीयांच्या वकिलांनी न्यायालयात केला आहे. या दाव्याच्या समर्थनार्थ वकील समीर हाटले यांनी उत्तर प्रदेश एसटीएफचे 10 ऑक्टोबर 2026 रोजीचे प्रसिद्धिपत्रक न्यायालयात सादर केले. त्यामुळे या प्रकरणातील हत्येमागील संभाव्य कारणाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. प्रदीप पूर्णेकर यांची 29 सप्टेंबर 2026 रोजी ठाण्यातील मानपाडा परिसरात हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. हल्लेखोरांनी पूर्णेकर यांच्या पक्ष कार्यालयात घुसून त्यांच्यावर गोळीबार केला आणि त्यानंतर धारदार शस्त्राने वार केले होते. हल्ल्याचे स्वरूप पाहता ही हत्या पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. तपासादरम्यान आरोपींना अटक करण्यात आली असून, आता निवडणुकीशी संबंधित जुन्या वादातून हा प्रकार घडल्याची माहिती आरोपींनी चौकशीत दिल्याचे न्यायालयात सांगण्यात आले.

आमदार बच्चू कडूंची जीभ घसरली

चंद्रपूर : दैनिक संध्या

प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी चंद्रपूरमध्ये पोलिसांवर अत्यंत शेलक्या शब्दांत टीका करत शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रकल्पग्रस्त आंदोलकांना पोलिसांकडून नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप करत कडू यांनी संताप व्यक्त केला. तसेच पोलिस प्रशासन वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडकडून पैसे घेत असल्याचा दावा देखील त्यांनी केला. त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आणि वापरलेल्या भाषेमुळे आता मोठा वाद निर्माण झाला आहे. चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांतील कोळसा खाणींमुळे बाधित झालेल्या गावकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात 'त्रिशूळ आंदोलन' पुकारण्यात आले आहे. या आंदोलनाचाच एक भाग म्हणून चंद्रपूरमधील कोरपना तालुक्यातील पैनगंगा कोळसा खाण परिसरापासून ते घुग्घुस शहरातील कारगिल चौकापर्यंत एक भव्य मोर्चा काढण्यात आला होता.

यंदाचा 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' १३ ते १७ जानेवारीमध्ये

■ पुणे (दै. संध्या)

■ प्रथमच फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजन

'महोत्सवांचा मुकूटमणी' म्हणून ओळखल्या जाणारा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव यंदा १३ ते १७ जानेवारी २०२७ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवाचे आयोजक असलेल्या आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी ही माहिती दिली. बहुतांश वर्षी डिसेंबरमध्ये आयोजित केला जाणारा हा अभिजात शास्त्रीय संगीताचा महोत्सव यंदा जानेवारीत आयोजित केला जाणार आहे. तसेच, यंदा तारखांसह स्थळ देखील बदलण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत मुकुंद नगर येथील महाराष्ट्रीय मंडळाचे क्रीडा संकुल येथे होणार हा महोत्सव यंदा प्रथमच शहराच्या मध्यवर्ती अशा शिवाजीनगर भागातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचे हे ७२ वे वर्ष असून महोत्सवासंबंधीचा इतर तपशील लवकरच जाहीर केला जाईल. हा महोत्सव शहरातील मध्यवर्ती भागात आयोजित करण्याच्या दृष्टीने आर्य संगीत प्रसारक मंडळाने फर्ग्युसन महाविद्यालयाचे मैदान मिळण्याबाबत डेक्कन एज्युकेशन सोसायटीशी चर्चा केली होती. सोसायटीने देखील सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर महोत्सवाचे स्थळ निश्चित झाले. मात्र डिसेंबरमध्ये याच मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचा कार्यक्रम पूर्वनियोजित असल्याने 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' डिसेंबरऐवजी जानेवारीत आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले.

महायुतीला धक्क्यावर धक्के, हसन मुश्रीफांचे सुपुत्र पराभूत

शौमिका महाडिकही हरल्या; गोकुळमध्ये सतेज पाटलांनी 'शिट्टी' वाजवली!

■ कोल्हापूर (दै. संध्या)

कोल्हापुरातील प्रतिष्ठेची लढाई मानली जाणारी म्हणजे गोकुळ दूध उत्पादक संघाची निवडणूक. या निवडणुकीची राज्यभर चर्चा सुरू आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेस नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली होती.

गेल्या अनेक वर्षांपासून गोकुळ दूध संघावर असलेले महाडिक घराण्याचे वर्चस्व मोडीत काढत, यंदाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांनी समविचारी आघाडीची सत्ता स्थापन करून महायुतीला मोठा धक्का दिला आहे. या निवडणुकीत पारंपरिक राजकीय घराण्यांतील अनेक दिग्गज नेते मैदानात असले तरी, मतदारांनी महायुतीच्या दोन प्रमुख नेत्यांना चांगलाच दणका



दिला. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या चिरंजीवांच्या पराभवानंतर, आता शौमिका महाडिक यांनाही अवघ्या 7 मतांनी पराभवाचा सामना करावा लागला असून, या निकालावर असमाधान व्यक्त करत त्यांनी फेरमतमोजणीची (रिकाउंटिंगची) मागणी केल्याचे समजते. महायुतीप्रणीत छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवार शौमिका अमल महाडिक यांना काँग्रेसप्रणीत सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार राजू जयवंतराव आवळे यांच्याकडून अवघ्या 7 मतांनी पराभव स्वीकारावा लागला. या निसटत्या पराभवामुळे महाडिक कुटुंबासह भाजप आणि महायुतीला मोठा राजकीय धक्का बसला आहे. गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाच्या 25 जागांसाठी 50 उमेदवार निवडणुकीत उतरले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील 5 हजार 418 पात्र मतदारांपैकी 5 हजार 416 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

आरोपींचे आका कुठेही लपलेले असोत, त्यांना शोधून काढू

टायगर श्रॉफवरील हल्ल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांचा गँगस्टर्सना इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

जुहूसारख्या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने मोठी खळबळ उडवून दिली आहे. या धक्कादायक घटनेनंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत पोलिसांच्या तपासाची माहिती दिली. पोलिसांनी रातोरात आरोपींची ओळख पटवली असून, हे भ्याड हल्लेखोर आणि त्यांचे मास्टरमाईंड (आका) जगाच्या पाठीवर कुठेही लपले असले, तरी त्यांना शोधून काढले जाईल, असा इशारा फडणवीस यांनी दिला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने



दखल घेतली आहे. पोलिसांच्या हाती या प्रकरणाचे महत्त्वाचे धागेदोरे लागले असून रातोरात मुख्य आरोपींची ओळख पटवण्यात आली आहे. लवकरच या आरोपींना बेड्या ठोकल्या जातील. हे लोक महाराष्ट्राबाहेरून किंवा देशाबाहेरून सूत्रे हलवत आहेत. त्यामुळे इतर राज्यांच्या पोलिसांशी समन्वय साधून आणि केंद्र सरकारची मदत घेऊन या सर्वांचा पर्दाफाश केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. टायगर श्रॉफवरील हल्ल्यानंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या विरोधकांचा फडणवीसांनी चांगलाच समाचार घेतला. "विरोधकांनी टीका करण्यापूर्वी थोडे अंतर्मुख होऊन स्वतःच्या काळाकडे पाहावे. हे तेच लोक आहेत ज्यांच्या काळात पोलिसांच्या मदतीने देशातल्या सर्वात मोठ्या उद्योगपतीच्या घरासमोर बॉम्ब ठेवण्यात आला होता. मनसुख हिरेन यांची हत्या आणि सीबीआयने उघडकीस आणलेले बदल्यांमधील घोटाळे ते कदाचित विसरले असावेत," असा घणाघाती पलटवार त्यांनी केला.

मुंबईत जंगलराज; लोकप्रतिनिधी, सेलिब्रिटीही असुरक्षित

■ मुंबई (दै. संध्या)

■ कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला: खासदार वर्षा गायकवाड

मुंबईतील वाढती गुन्हेगारी, लोकप्रतिनिधी आणि सेलिब्रिटींच्या सुरक्षेचा प्रश्न तसेच कायदा-सुव्यवस्थेच्या ढासळत्या स्थितीवरून मुंबई काँग्रेसने राज्य सरकार आणि पोलिस प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. मुंबईत लोकप्रतिनिधींपासून चित्रपट कलाकारांपर्यंत कोणीही सुरक्षित नसल्याचे चित्र दिसत असून, शहरात कायदा-सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. जागतिक दर्जाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत जंगलराज निर्माण झाले आहे. राज्याला पूर्णवेळ सक्षम गृहमंत्री नसल्याने गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष तथा खासदार वर्षा गायकवाड यांनी केला. कायदा-सुव्यवस्थेच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मुंबई काँग्रेसच्या शिष्टमंडळाने रविवारी मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांची भेट घेतली. यावेळी शहरातील वाढती गुन्हेगारी, महिला अत्याचार, अलीकडील गोळीबाराच्या घटना, राजकीय पदाधिकाऱ्यांच्या हत्या तसेच ॥T बॉम्बेमधील विद्यार्थी साहिल वाकोडे प्रकरण आणि आदिवासी विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाईचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

अंबाबाई दर्शनासाठी दीड लाखावर भाविक

एका दिवसात गर्दीचा उच्चांक; सात दिवसांत १० लाखांचा टप्पा : सुरक्षा व सुविधेसाठी प्रशासन सज्ज

■ मुंबई (दै. संध्या)

शरदीय नवरात्रोत्सवाच्या सातव्या दिवशी रविवारी करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात भाविकांच्या गर्दीचा उच्चांक नोंदविण्यात आला. रविवारीची सुट्टी आणि नवरात्रोत्सव यांचा योग साधत पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांचा महापूर लोटला. दिवसभरात दीड लाखांहून अधिक भाविकांनी देवीचे दर्शन घेतले, तर घटस्थापनेपासून सात दिवसांत दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या दहा लाखांच्या घरात पोहोचली आहे.

वाढत्या गर्दीमुळे मुख्य दर्शन मंडप, मुखदर्शन रांग आणि शेतकरी बाजार येथील दर्शन मंडप दिवसभर भाविकांनी फुलून गेले होते. रविवारी पहाटे साडेपाच वाजल्यापासून परगावाच्या भाविकांनी मंदिराकडे धाव घेतली. लवकर दर्शन मिळावे यासाठी अनेक भाविकांनी रात्री दोन ते अडीच वाजल्यापासूनच मंदिर आवारात हजेरी लावली होती. सकाळी अकराच्या सुमारास मुख्य दर्शन मंडप, दर्शन रांग आणि शेतकरी बाजार परिसरातील दर्शन मंडप पूर्ण भरून गेले होते.



दर्शन रांगा मंडपाबाहेरपर्यंत पोहोचल्या होत्या. मुखदर्शनासाठीची रांगही सात ते आठ फेऱ्यांमध्ये लागली होती. उन्हाचा तडाखा असूनही भाविकांचा उत्साह कायम होता. दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागत असतानाही भाविकांची गर्दी कमी होत नव्हती. रात्री उशिरापर्यंत मंदिर परिसरात भाविकांचा ओघ सुरूच होता. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातून भाविक मोठ्या संख्येने कोल्हापूरात दाखल झाले आहेत. नवरात्रोत्सवातील शनिवार आणि रविवार हे गर्दीच्या दृष्टीने महत्त्वाचे दिवस मानले जातात. यंदाही शनिवारपासून भाविकांची संख्या वाढण्यास सुरुवात झाली. रविवारी सुट्टीमुळे गर्दीत आणखी भर पडली. मुख्य दर्शन रांग, मुखदर्शन, अभिषेक आणि कळसदर्शनासाठी मंदिर परिसरात भाविकांची गर्दी झाली होती. काकड आरतीपासून शेजारतीपर्यंत विविध धार्मिक विधिमध्ये सहभाग घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली. कुंकुमार्चन आणि अभिषेक करण्यासाठीही भाविक प्रतीक्षा रांगेत थांबले होते. देवीच्या दर्शनासोबतच धार्मिक विधी करण्यासाठी भाविकांची संख्या जास्त असल्याने प्राधान्य दिले जात असल्याने मंदिर परिसरात दिवसभर वर्दळ कायम होती. साडेतीन शक्तिपिठांपैकी एक आणि दक्षिण काशी म्हणून ख्याती असलेल्या अंबाबाईच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवात दरवर्षी लाखो भाविक कोल्हापुरात येतात. यंदा घटस्थापनेपासून मंदिरात गर्दीचा ओघ वाढत आहे. सात दिवसांतही दहा लाख भाविकांनी दर्शन घेतल्याने आगामी दिवसार्हतही गर्दी कायम राहण्याची शक्यता आहे. वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षितपणे दर्शन घेता यावे, तसेच रांगेतील प्रतीकेदरम्यान आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाकडून नियोजन केले जात आहे. दर्शन रांगेत बराच वेळ थांबणाऱ्या भाविकांना पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पाणीवाटपाची व्यवस्था करण्यात आली. तसेच पाण्याचे जार आणि पाणीवाटपासाठी कर्मचारी वाढविण्यात आले. उन्हाचा तडाखा आणि लांबलेल्या दर्शन रांगा लक्षात घेता भाविकांना पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात आली.

गर्दी वाढल्याने पाण्याची अतिरिक्त व्यवस्था

अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढल्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे. रविवारी गर्दीचा वाढता ओघ लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीला अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यात आला. यासाठी पाच हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी अतिरिक्त भरून घेण्यात आली.

सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर पोलिसांचा बडगा

■ ७ वाहने जप्त; बारामती तालुका हद्दीत ५ तर बारामती शहर हद्दीत २ गुन्हे दाखल

■ "रस्ता हा पार्किंगची जागा नाही; चुकीचे पार्किंग इतरांच्या जीविताला आणि वाहतुकीला धोका ठरू शकते."



■ बारामती (दै. संध्या)

सार्वजनिक रस्ते हे सर्व नागरिकांच्या सुरक्षित व सुरळीत वाहतुकीसाठी आहेत. रस्त्यावर मनमानी पद्धतीने वाहने उभी करून वाहतुकीचा प्रवाह रोखणे, इतर वाहनांना व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करणे आणि अपघाताचा धोका निर्माण करणे याविरुद्ध बारामती विभाग पोलिसांनी ठोस कारवाई सुरू केली आहे.

दि. १७/१०/२०२६ रोजी बारामती विभागात करण्यात आलेल्या विशेष कारवाईत सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने उभ्या करण्यात आलेल्या वाहनांबाबत भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये बारामती तालुका पोलीस ठाणे हद्दीत ५ गुन्हे व बारामती शहर पोलीस ठाणे हद्दीत २ गुन्हे, असे एकूण ७ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. संबंधित ७ वाहने जप्त करून पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली असून, संबंधित वाहनमालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्रकरणांचा तपास सुरू असून तपास पूर्ण झाल्यानंतर कायद्यानुसार मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. भारतीय न्याय संहिता कलम २८५ हे सार्वजनिक मार्ग किंवा सार्वजनिक जलमार्गात एखाद्या कृतीमुळे किंवा आपल्या ताब्यातील मालमत्तेबाबत आवश्यक खबरदारी न घेतल्यामुळे कोणत्याही व्यक्तीस धोका, अडथळा किंवा इजा निर्माण करण्याशी संबंधित आहे. या कलमान्वये दोषसिद्धी झाल्यास ₹५,००० पर्यंत दंड होऊ शकतो. BNSS च्या प्रथम अनुसूचीनुसार हा गुन्हा दखलपात्र (Cognizable), जामीनपात्र (Bailable) असून कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडून विचारणीय आहे.

याशिवाय मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १२२ नुसार कोणतेही वाहन सार्वजनिक ठिकाणी अशा स्थितीत किंवा अशा प्रकारे उभे ठेवता येत नाही की त्यामुळे इतर रस्ता वापरणाऱ्यांना धोका, अडथळा किंवा अनावश्यक गैरसोय निर्माण होईल.

मोटार वाहन अधिनियमाचे कलम २०१ विशेषतः वाहतुकीच्या मुक्त प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांशी संबंधित आहे. सार्वजनिक ठिकाणी वाहन अशा प्रकारे उभे केल्यास की त्यामुळे वाहतुकीच्या मुक्त प्रवाहात अडथळा निर्माण होतो, ₹५०० पर्यंत दंडात्मक कारवाई होऊ शकते. अधिकृत यंत्रणेकडून वाहन हटविण्यात आल्यास कायद्यानुसार वाहन हटविण्याचा व साठवणुकीचा खर्चही वाहनमालक अथवा वाहनाच्या ताबेदाराकडून वसूल केला जाऊ शकतो.

केंद्र सरकारच्या Motor Vehicles (Driving) Regulations, 2017 मधील Regulation 22 मध्ये वाहन थांबविणे व पार्किंग करण्याबाबत स्पष्ट नियम आहेत. त्यानुसार अरुंद रस्ता किंवा पुढील दृश्य दिसत नसलेले ठिकाण, तीव्र वळण, पादचारी क्रॉसिंग, रेल्वे क्रॉसिंग, ट्रॅफिक सिग्नल किंवा STOP/GIVE WAY चिन्हाजवळ, बस थांबा, फुटपाथ, सायकल ट्रॅक, चौक-जंक्शनच्या जवळ, शाळा किंवा रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ, बस लेन, घर-दुकानाच्या प्रवेशद्वारासमोर, सतत पिवळी रेषा असलेल्या जागी, दुसऱ्या वाहनाच्या बाजूला डबल पार्किंग करून किंवा No Parking चिन्ह असलेल्या जागी वाहन पार्क करता येत नाही. चौक किंवा जंक्शनच्या कडेपासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात पार्किंग करण्यासही नियमांनुसार मनाई आहे. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो अधिकृत/निर्दिष्ट पार्किंगमध्येच वाहन उभे करावे; पार्किंग बे असल्यास वाहन पूर्णपणे त्या बेच्या आत ठेवावे; रस्त्याचा मुख्य प्रवाह, दुकान-घराचे प्रवेशद्वार, आपत्कालीन वाहनांचा मार्ग, पादचारी मार्ग किंवा इतर वाहनांना वळण्यासाठी आवश्यक जागा अडणार नाही याची खात्री करावी. "फक्त दोन मिनिटांसाठी वाहन ठेवले आहे" या कारणामुळे निर्माण झालेला वाहतुकीचा अडथळा दुर्लक्षित केला जाऊ शकत नाही.

बारामती विभागात वाढती वाहतूक लक्षात घेता चुकीच्या पार्किंगमुळे केवळ वाहतूक कोंडीच होत नाही, तर रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस वाहने व इतर आपत्कालीन सेवांच्या हालचालीतही विलंब होऊ शकतो.

पादचारी रस्त्यावर उतरल्यामुळे अपघाताचा धोका वाढतो, तर चौक, वळण व मुख्य रस्त्यावर चुकीच्या पद्धतीने उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहनचालकांचे दृश्य क्षेत्र कमी होऊ शकते. त्यामुळे अशा कारवाईकडे केवळ दंडात्मक कारवाई म्हणून न पाहता रस्ता सुरक्षितता व नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्याचा प्रयत्न म्हणून पाहावे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम, बारामती शहर पोलिस स्टेशन प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती मनीषा ओमासे तसेच वाहतूक विभागाचे प्रभारी श्री महेश स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. बारामती विभाग पोलिसांकडून सर्व वाहनचालक व वाहनमालकांना आवाहन करण्यात येते की, "माझे वाहन कुठे उभे आहे?" एवढाच विचार न करता, "माझ्या वाहनामुळे इतर कोणाचा रस्ता, सुरक्षितता किंवा हक्क अडत तर नाही ना?" याची खात्री करूनच वाहन पार्क करावे. नागरिकांच्या सहकार्यानेच वाहतूक कोंडी कमी करून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अपघातमुक्त बारामती निर्माण करणे शक्य आहे. "योग्य पार्किंग ही केवळ वाहतूक शिस्त नाही— ती दुसऱ्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे." "रस्ता मोकळा ठेवा—आपत्कालीन वाहनासाठी वाचलेले काही मिनिटे एखाद्याचा जीव वाचवू शकतात." "सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर यापुढेही सातत्याने कायदेशीर कारवाई करण्यात येईल." "बारामती विभाग पोलीस — सुरक्षित रस्ते, सुरळीत वाहतूक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध."

थोडक्यात पण महत्वाचे



राणा सूर्यवंशी हल्ला प्रकरणी सुनेत्रावहिनी पवार ॲक्शन मोडमध्ये

■ पोलीस अधीक्षकांना कठोर कारवाईचे निर्देश

बारामती : दैनिक संध्या

बारामती विमानतळ परिसरात राणा शिपिंग कंपनीचे मालक श्री. राणा सूर्यवंशी यांच्यावर झालेला हल्ला ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी व्यक्त केली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत त्यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. संबंधित हल्लेखोरांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणालाही खेळू दिले जाणार नाही. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. या प्रकरणात कोणाचीही गय केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राणा सूर्यवंशी यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभावे, अशी सदिच्छा उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी व्यक्त केली.



रक्तदान व मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

काऱ्हाटी (बारामती) : दैनिक संध्या

आयएसओ ९००१:२०१५ मानांकित कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था (KUMSS),काऱ्हाटी संकुलात रक्तदान शिबिर व मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर उत्साहात पार पडले.संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मा.श्रीमती सुनेत्रा (वहिनीसाहेब) अजितदादा पवार यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त शनिवार,दि. १७ ऑक्टोबर रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी रेड क्रॉस सोसायटीचे सहकार्य लाभले. शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता झाले.त्यानंतर दुपारी ४ वाजेपर्यंत शिबिर सुरू होते.या उपक्रमाला नागरिक,विद्यार्थी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिवसभरात रक्तदान व हिमोग्लोबिन तपासणीसाठी एकूण १२७ जणांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष संभाजीनाना होळकर,श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुनील नारायण भगत, रवींद्र जयवंतराव भापकर,राजेंद्र हरिभाऊ बोरकर,मकरंद चंद्रकांत सस्ते,माजी व्हाईस चेअरमन आनंद होळकर,बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार,बारामती तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पोमणे, कृषि उत्पन्न बाजार समिती,बारामतीचे माजी सभापती शौकत सिकंदर कोतवाल, काऱ्हाटीच्या सरपंच सौ.दिपाली योगेश लोणकर,माळवाडीच्या सरपंच सौ.मंजू दीपक लडकत, काऱ्हाटीचे माजी उपसरपंच गणेश शिंदे,सामाजिक कार्यकर्ते नितीन पोमणे,दत्तात्रय भापकर,लखन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.दशरथदादा धुमाळ,विश्वस्त मा. श्री. दत्तात्रय वाबळे, संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य, प्राचार्या,उपप्राचार्य,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदानातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याबरोबरच हिमोग्लोबिन तपासणीच्या माध्यमातून आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला. संस्थेच्या वतीने शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या रेड क्रॉस सोसायटीचे, उपस्थित मान्यवरांचे आणि सहभागी नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विकास संजय निर्मळ यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष श्री.दशरथदादा धुमाळ यांनी केले तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री.विजय काळे यांनी केले.

संगमनेर तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढली

■ संगमनेर (दै. संध्या)



■ असंख्य कार्यकर्त्यांसह दिव्यांग बांधवांचा पक्षप्रवेश

संगमनेर तालुक्यातील बोटा पठार भागातील असंख्य कार्यकर्त्यांसह दिव्यांग बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. संगमनेर येथील मातोश्री लॉन्स येथे आयोजित या पक्षप्रवेश सोहळ्यात शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत नव्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजातील सर्वसामान्य घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच सामाजिक कार्याला गती देण्यासाठी आपण शिवसेनेत सहभागी होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पक्षात प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. संगमनेर तालुक्यात शिवसेनेचा जनाधार वाढत असून, सर्वसामान्य नागरिकांसह दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांना न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

आमदार दिलीप सोपल यांच्या पाठपुराव्याला यश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ बार्शी (दै. संध्या)



कर्करुग्णांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून,महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत PET-CT स्कॅन तपासणीचा समावेश करण्यात आला आहे.या निर्णयामुळे पात्र कर्करुग्णांना महागड्या तपासणीचा आर्थिक भार कमी करण्यास मदत होणार आहे. आमदार ना.दिलीप सोपल,कार्याध्यक्ष स्व.डॉ.बी.एम.नेने अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च सेंटर, बार्शी यांनी कर्करुग्णांची गरज लक्षात घेऊन मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना.प्रकाश आबिटकर यांची समक्ष भेट घेऊन PET-CT तपासणीचा जनआरोग्य योजनांमध्ये समावेश करण्याची मागणी केली होती. कर्करोगाचे अचूक निदान,आजाराचा टप्पा निश्चित करणे आणि उपचारांचा परिणाम तपासण्यासाठी PET-CT स्कॅन महत्त्वाची तपासणी आहे.मात्र,या तपासणीचा खर्च जास्त असल्याने अनेक रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. काही वेळा आर्थिक परिस्थितीमुळे तपासणीला विलंब होऊन उपचारांच्या नियोजनावरही परिणाम होतो.ही बाब आमदार दिलीप सोपल यांनी मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार संबंधित यंत्रणेने कार्यवाही केली. सार्वजनिक आरोग्य विभागाने अभ्यास समितीच्या शिफारशींचा विचार करून दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी केला.या निर्णयानुसार ६३ कर्करोग उपचार पॅकेजमध्ये PET-CT स्कॅनचा अतिरिक्त निदान प्रक्रिया (Add-on Diagnostic Procedure) म्हणून समावेश करण्यात आला आहे.तसेच निवडक १३ प्रकारच्या कर्करोग उपचारांसाठी स्वतंत्र/नियमित निदान प्रक्रिया (Regular/Primary Procedure) म्हणून PET-CT स्कॅनला मान्यता देण्यात आली आहे.या निर्णयामुळे पात्र कर्करुग्णांना योजनेच्या नियमानुसार तपासणीची सुविधा मिळण्यास मदत होणार असून निदान व उपचार अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. कर्करुग्णांच्या आरोग्यहिताला प्राधान्य देत आमदार दिलीप सोपल यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय झाला असून,बार्शीसह राज्यातील पात्र कर्करुग्णांसाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे.

श्रीमती वर्षा घुगे-ठाकूर यांचा बारामती दौरा

चांबळी आयटी पार्क, पुरंदर विमानतळ आणि इंदापूर औद्योगिक वसाहतीचा घेतला आढावा

■ बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) सह मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा घुगे-ठाकूर यांनी बारामती प्रादेशिक विभागाचा दौरा करून विविध प्रकल्पांच्या जागांची प्रत्यक्ष पाहणी केली.

दौऱ्यादरम्यान त्यांनी प्रस्तावित चांबळी आयटी पार्क अंतर्गत चांबळी, कोडित खुर्द, कोडित बुद्रुक आणि दिवे या गावांतील जागांना भेट देऊन पाहणी करण्यात आली. प्रस्तावित पुरंदर विमानतळ अंतर्गत समाविष्ट बाधित गावांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

बारामती प्रादेशिक कार्यालय आणि अभियांत्रिकी विभागाच्या कार्यालयास भेट देऊन कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बारामती प्रादेशिक कार्यालयाचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी राबविलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करुन सर्व टीमचे अभिनंदन केले. अधिकाऱ्यांना गतिमान आणि लोकाभिमुख प्रशासन राबवण्याबाबत महत्त्वाच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बारामती इंडस्ट्रियल असोसिएशनचे धनंजय जामदार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ग्रुपचे श्री. काकडे या इंडस्ट्रियल असोसिएशन सोबत बैठक घेऊन अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. सर्वच क्षेत्रातील इंडस्ट्रियल असोसिएशनचे औद्योगिक विकासासाठी असणारे योगदानाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रादेशिक कार्यालय व असोसिएशन यांनी सौहार्द पूर्ण संबंध ठेवून औद्योगिक विकासाला गती द्यावी अशा सूचना दिल्या.

महिला सक्षमीकरण, मोठ्या प्रमाणावर महिलांना देण्यात येणारा रोजगार, महिला आरोग्य याबाबत बारामती टेक्सटाईल पार्कमध्ये सुरू असलेल्या उत्कृष्ट दर्जाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

इंदापूर तालुक्यातील जंक्शन येथील औद्योगिक वसाहतीच्या पहिल्या टप्प्यातील १३१ हेक्टर जमिनीची तसेच प्रस्तावित १००० एकर जमिनीची पाहणी केली. या जमिनीचे त्वरित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

संपूर्ण बारामती शहरातील स्वच्छता, नीटनेटकेपणा, भव्य इमारती, सुंदर बारामती, हरित बारामती व बारामती औद्योगिक नगरीतील सुरू असलेल्या नवनवीन उद्योगांच्या कामाबाबत श्रीमती घुगे यांनी समाधान व्यक्त केले.

बारामतीत सांडपाण्यावर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर अधिकाधिक हरित, स्वच्छ आणि पर्यावरणस्नेही ठेवण्यासाठी तसेच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बारामती नगरपरिषदेने सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि त्याचवेळी बारामती शहर अधिकाधिक स्वच्छ व हिरवेगार ठेवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून शुद्ध केलेले पाणी शहरातील झाडे, उद्याने आणि हिरवळ जोपासण्यासाठी वापरण्यात येत असून, नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य करावे. सध्या सर्वत्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने बारामती शहरातील नगरपरिषदेच्या माध्यमातून होणाऱ्या दैनंदिन पाणीपुरवठ्यामध्ये कपात करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची बचत करण्याच्या उद्देशाने सांडपाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापरासाठी उपलब्ध केलेल्या पाण्याचा उपयोग स्वच्छता, झाडे आणि उद्यानांच्या सिंचनासाठी केला जात आहे. शहरातील स्वच्छता आणि सौंदर्य अबाधित राखण्यासाठी दररोज सरासरी लाखो लिटर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करण्यात येत आहे. सांडपाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जात असली, तरी हे पाणी केवळ स्वच्छता, झाडे, उद्याने आणि हिरवळ जोपासण्यासाठी वापरण्यायोग्य आहे. ते पिण्यासाठी किंवा वैयक्तिक वापरासाठी योग्य नाही. त्यामुळे नागरिकांनी या पाण्याचा पिण्यासाठी वापर करू नये, तसेच प्रक्रिया केलेल्या पाण्याबाबत कोणताही गैरसमज अथवा चुकीची धारणा करून घेऊ नये. शहराच्या शाश्वत विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाला सर्व नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन सहकार्य करावे, असे आवाहन बारामती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले आहे.

युवा उद्योजक गणेश माने यांचे पुण्यात उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन

लाखेवाडी परिसरावर शोककळा

■ इंदापूर (दै. संध्या)



लाखेवाडी (ता. इंदापूर) येथील मानेमळा परिसरातील तरुण, धडपडी उद्योजक गणेश आबासाहेब माने (वय २३ वर्षे) यांचे पुण्यात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. पुण्यातील केईएम रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असताना रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:१५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. गणेश माने हे 'तुकाई ॲग्रो'चे संचालक होते. आपल्या मनमिळाऊ, कष्टाळू आणि शांत स्वभावामुळे त्यांनी अल्पावधीतच व्यवसाय क्षेत्रात तसेच स्थानिक तरुणांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. भरउमेदीच्या वयातच काळाने त्यांच्यावर घाला घातल्याने लाखेवाडी व इंदापूर परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ते धाराशिव येथील गुप्तवार्ता विभागातील मुख्य अधिकारी श्री. बाळासाहेब माने यांचे पुतणे होत. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, आजी असा मोठा परिवार आहे. रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी रात्री ११:०० वाजता लाखेवाडी येथील त्यांच्या शेतात अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रांतील मान्यवर, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माने कुटुंबीयांच्या दुःखात संपूर्ण परिसर सहभागी झाला आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



आत्मनिर्भर भारतासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता : सुधीर काळकर

पुणे : दैनिक संध्या

उद्योगविश्वात आजही कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. शिक्षण आणि प्रत्यक्ष काम करणारे मनुष्यबळ तयार करणे ही आताची गरज आहे. त्याच दृष्टीने शिक्षण प्रसारक मंडळी प्रयत्नशील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत आत्मनिर्भर व्हावा यासाठी गेल्या काही वर्षात बरेच प्रयत्न केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शि. प्र. मंडळीच्या वेलिंगकर इन्स्टीट्यूटची तिसरी शाखा पुण्यात पुढील वर्षी सुरू करत असल्याचे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर यांनी सांगितले. भारतामध्ये जगाला विश्वगुरू म्हणून मार्गदर्शन करण्याची क्षमता असल्याचे त्यांनी नमूद केले. शि. प्र. मंडळीच्या प्रिन्सिपल एल. एन. वेलिंगकर इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च (वी-स्कूल) यांच्या वतीने माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट मेळाव्याचे आयोजन सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावरील ज्ञानमंडपम येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेशाम अग्रवाल, सचिव रमा कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सुनील जोशी आदी उपस्थित होते. सुधीर काळकर म्हणाले, "येत्या काळात जिओपॉलिटीकल, तांत्रिक, देशांच्या सीमेबाबत अशी विविध प्रकारची आव्हाने वाढणार आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि देश सक्षम बनविण्यासाठी उत्तम मनुष्यबळाची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास शिकवून उपयोग नाही, तर त्यांना अडचणींचा सामना कसा करायचा, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्ये, आपल्या मुळांना धरुन राहण्याची मूल्ये यांसारख्या गोष्टी शिकवायला हव्यात. शिक्षण हे एकमेव असे क्षेत्र आहे जिथे स्पर्धा नाही. त्यामुळे या माध्यमातून उत्तम विद्यार्थी घडवणे हेच शिक्षण प्रसारक मंडळीचे ध्येय आहे. देशाच्या विकासात योगदान देऊ शकणाऱ्या कुशल व्यवस्थापकांना घडविण्याचे काम वेलींकर इन्स्टिट्यूट करत आहे."

वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडियात के-पॉप आणि भारतीय कलाकारांची मांदियाळी



पुणे : दैनिक संध्या

वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडियाच्या पहिल्या पर्वासाठी आंतरराष्ट्रीय के-पॉप आणि भारतीय कलाकारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. हा दोन दिवसीय महोत्सव २७ आणि २८ मार्च २०२७ रोजी नवी दिल्ली येथे होणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवात एनहायपेन, ले सेराफिम, टुमारो एक्स टुगेदर, ह्वासा, डयॉन्ग, एरिक नाम, बमझू यांच्यासह अन्य आंतरराष्ट्रीय कलाकार सहभागी होणार आहेत. भारतीय कलाकारांमध्ये किंग, गिनी, रंज एक्स क्लिफर, रिबेल आणि डीजे झेलो यांचा समावेश आहे. एचवायबीई इंडिया आणि बुकमायशो लाइव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. के-पॉप आणि भारतीय संगीताचा संगम घडवून आणणे, तसेच भारतीय चाहत्यांना जागतिक दर्जाचा संगीतानुभव देणे, हा या महोत्सवाचा उद्देश आहे. मास्टरकार्डधारकांसाठी २७ ऑक्टोबरपासून तिकिटांची विशेष पूर्वविक्री सुरू होणार असून, सर्वसामान्यांसाठी ३० ऑक्टोबरपासून बुकमायशोवर तिकिटे उपलब्ध होतील.

मका आणि ऊस पिकांतील तण नियंत्रणासाठी धानुका एग्रीटेकचे 'टेम्बोट्रैक्स' सादर



पुणे : दैनिक संध्या

धानुका एग्रीटेक लिमिटेडने मका आणि ऊस पिकांतील तणांच्या प्रभावी नियंत्रणासाठी 'टेम्बोट्रैक्स' हे नवीन तणनाशक बाजारात सादर केले आहे. टेम्बोट्रिओन ३४.४ टक्के एससी हा सक्रिय घटक असलेले हे तणनाशक पिकांच्या उगवणीनंतरच्या सुरुवातीच्या टप्प्यातील तण नियंत्रणासाठी विकसित करण्यात आले आहे. या तणनाशकामुळे रुंद आणि अरुंद पानांच्या तणांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होते. परिणामी, पिकांशी तणांची होणारी पोषकद्रव्ये, पाणी आणि सूर्यप्रकाशासाठीची स्पर्धा कमी करण्यास मदत होते. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राहुल धानुका यांनी सांगितले की, पिकांच्या सुरुवातीच्या वाढीच्या टप्प्यात तणांचे प्रभावी व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना पीक संरक्षणासाठी उपयुक्त उपाय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे उत्पादन सादर करण्यात आले आहे. या हंगामातील कंपनीचे हे चौथे प्रमुख उत्पादन असून, भारतीय शेतकऱ्यांच्या बदलत्या गरजांनुसार पीक संरक्षणासाठी नवनवीन उत्पादने उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे.

ujjivan SMALL FINANCE BANK
Build a Better Life

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा तिमाही नफा ३६५ कोटी रुपयांवर; २९.२ टक्के वाढ

पुणे : दैनिक संध्या

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने सप्टेंबर २०२६ मध्ये संपलेल्या तिमाहीची आर्थिक कामगिरी जाहीर केली. या तिमाहीत बँकेने आतापर्यंतचा सर्वोच्च ३६५ कोटी रुपयांचा करपश्चात नफा नोंदवला आहे. बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वार्षिक आधारावर २९.२ टक्के वाढ होऊन ठेवी ५०,६४३ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. तर एकूण कर्जवितरणात ३२.१ टक्के वाढ नोंदवण्यात आली असून कर्जवितरणाचा एकूण आकडा ४५,६९९ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. बँकेच्या पूर्णवेळ संचालक आणि अंतरिम मुख्य कार्यकारी अधिकारी कॅरोल फुर्टाडो यांनी सांगितले की, बँकेच्या वाढीचा वेग कायम ठेवण्यासाठी संचालक मंडळाने प्राधान्य वाटपाद्वारे ४०९ कोटी रुपयांचे भांडवल उभारण्यास मंजुरी दिली आहे. या माध्यमातून इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन, बजाज लाइफ इन्शुरन्स, एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स आणि आदित्य बिर्ला सन लाइफ इन्शुरन्स यांच्याकडून निधी उभारण्याचे नियोजन आहे. ही प्रक्रिया भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन आहे. सप्टेंबर २०२६ अखेरच्या समभागमूल्यापेक्षा अधिक दराने प्रस्तावित भांडवल उभारणी होत असल्याने प्रति समभाग सुमारे ०.८ रुपयांची वाढ होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय, ऑक्टोबरमध्ये रोखेकरणाच्या माध्यमातून ५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला आहे. यामुळे बँकेच्या निधी उभारणीच्या स्रोतांमध्ये विविधता वाढली आहे.

चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा व राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारांचे वितरण

समाज कल्याण विभागामार्फत पुणे जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घटनात्मक पदावरील कारकिर्दीची २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'सेवा परमो धर्मः' या संकल्पनेवर आधारित सेवा संकल्प अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यात सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात आले. या अभियानांतर्गत रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, आरोग्य तपासणी, योग व ध्यान सत्र, सायबर सुरक्षा



आणि व्यसनमुक्ती जनजागृती, मतदार नोंदणी, शासकीय योजनांची माहिती तसेच अनाथालय व वृद्धाश्रमांना भेटी आदी उपक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये समाज कल्याण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, वसतिगृह व निवासी शाळांचे शिक्षक आणि विद्यार्थी सहभागी झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जिल्हास्तरीय चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या. वक्तृत्व स्पर्धेत गट अ मध्ये यशराज निखील दहींजे, गट ब मध्ये प्रणाली दादा कांबळे आणि गट क मध्ये शितल गोकुळ तायडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. चित्रकला स्पर्धेत गट अ मध्ये संतोष शिवराया डोंगरे, गट ब मध्ये ऐश्वर्या विनायक कांबळे आणि गट क मध्ये अंजली सुग्रीव बडे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना समाज कल्याण विभागाच्या विशेष अधिकारी माधुरी वाघमोडे यांनी केली. सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी तयारी करण्याचे आवाहन केले. तसेच गुणवत्ता पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती कायम राखावी, असे सांगितले. यावेळी समाज कल्याण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, वसतिगृहांचे गृहप्रमुख व गृहपाल, निवासी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, बार्टीचे प्रकल्प अधिकारी, समतादूत आणि विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

विवोचा तंत्रज्ञान क्षेत्रात नवा विस्तार; पहिला मिश्र वास्तव हेडसेट सादर

■ पुणे (दै. संध्या)



विवो इंडियाने आज विवो नेक्स्ट कार्यक्रमात आपला पहिला मिक्स्ड रिॲलिटी (एमआर) हेडसेट सादर केला. यासह, कंपनीने भारतातील 'स्पेशियल कम्प्युटिंग'च्या क्षेत्रात प्रवेश केला आहे आणि कनेक्टेड व तल्लीन करणाऱ्या अनुभवांसाठी नवीन शक्यता दर्शवल्या आहेत. विवो व्हिजन डिस्कव्हरी एडिशन, डिजिटल सामग्रीशी संवाद साधण्याचे अधिक सुलभ मार्ग तयार करण्यासाठी आणि पारंपरिक स्क्रीनच्या पलीकडील अनुभव देण्यासाठी विवोच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमधील क्षमतांना एकत्र आणते. आराम, सुलभ संवाद आणि तल्लीनतेसाठी डिझाइन केलेल्या, विवो व्हिजन डिस्कव्हरी एडिशनमध्ये नैसर्गिक डोळे आणि हाताच्या नियंत्रणासाठी हलके, एर्गोनॉमिकली ऑप्टिमाइझ्ड केलेले फॉर्म फॅक्टर आहे. या हेडसेटचे वजन फक्त ३९८ ग्रॅम आहे, ज्यामुळे तो अत्यंत हलका आणि आरामदायक बनतो. मानवी वापराच्या व्यापक संशोधनावर आधारित, याच्या डिझाइनमध्ये चार आकारांचे लाईट सील्स आणि आठ प्रकारची फोम पॅडिंग आहेत, जेणेकरून दीर्घकाळ वापरताना किंवा सक्रिय हालचालींदरम्यानही आरामदायक फिट आणि वापरसुलभता सुनिश्चित करता येईल. एमआर हेडसेटमध्ये ४के ड्युअल बायनोक्युलर मायक्रो-ओएलईडी डिस्प्ले आणि स्नॅपड्रॅगन एक्सआर2+ जेन 2 प्लॅटफॉर्मचा वापर केला आहे, ज्यामुळे सुस्पष्ट व्हिज्युअल्स आणि प्रतिसादात्मक डोळे व हातांचा मागोवा मिळतो. हे प्रदर्शन मनोरंजन आणि गेमिंगच्या माध्यमातून या क्षमतांना जिवंत करते. वापरकर्ते १२०-फूट व्हर्च्युअल थिएटर स्क्रीनवर चित्रपट पाहू शकतात, ३६०-डिग्री इमर्सिव्ह वातावरणाचा अनुभव घेऊ शकतात, खोलीसह विशेष प्रतिमा पाहू शकतात आणि त्यांच्या खोलीच्या वातावरणात मिसळून जाणारे मिक्स्ड रिॲलिटी गेम्स खेळू शकतात.

माहितीपटाचा ऐतिहासिक ठेवा चित्रपट संग्रहालयाकडून सुपूर्द

■ पुणे (दै. संध्या)



भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या कार्यावर तयार केलेल्या माहितीपटाची अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रूपांतर केलेली प्रत राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाकडून आज भांडारकर संस्थेला सन्मानपूर्वक हस्तांतरित करण्यात आली. हा माहितीपट संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने ख्यातनाम निर्माते दिनकर जोशी यांनी १९६७ साली तयार केला होता. नानी शहापूरकर हे त्याचे दिग्दर्शक होते. भांडारकर संस्थेच्या मानद सचिवपदी तेव्हा ख्यातनाम संशोधक पद्मभूषण डॉ. रा. ना. दांडेकर हे होते.

केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून (सेन्सॉर बोर्ड) १९६९ मध्ये पारित झालेल्या माहितीपटाचा हा ऐतिहासिक ठेवा राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक प्रकाश मगदूम यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष भूपाल पटवर्धन यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी चित्रपट संग्रहालयाचे व्यवस्थापक भावेश सिंग, भांडारकर संस्थेच्या व्यवस्थापनाचे सदस्य सुनील भंडगे, मनोज एरंडे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आदि मान्यवर उपस्थित होते.

इंग्रजी माहितीपटाच्या चित्रीकरणाचे प्रत्यक्षदर्शी असलेले ज्येष्ठ संशोधक डॉ. ग. उ. थिटे यांनी सांगितले की, तीन ते चार दिवस हे काम सुरू होते आणि त्याविषयी मोठे औत्स्युक्य होते. संस्थेचे निबंधक डॉ. श्रीनन्द बापट यांनी याविषयी अधिक माहिती देतांना सांगितले की, सध्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाची जागा ही डॉ. मु. रा. जयकर यांची आहे. डॉ. जयकर हे तत्कालीन पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. त्यावेळी भांडारकर संस्थेच्या जागेतच १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना झाली. त्यामुळे डॉ. जयकर, चित्रपट संग्रहालय आणि भांडारकर संस्थेचे जुने ऋणानुबंध आहेत. या माहितीपटाच्या त्यावेळच्या ३५ एमएमची रिळे असलेल्या प्रती सन २००३ मध्ये दिनकर जोशींनी भांडारकर संस्थेकडे सुपूर्द केल्या होत्या, नंतर २००८ मध्ये त्याचे योग्य जतन व्हावे म्हणून त्या चित्रपट संग्रहालयाला देण्यात आल्या. या माहितीपटाशिवाय फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटने संस्थेसंबंधात दोन फिल्म्स केल्या आहेत, त्यांचा देखील शोध घेणे आवश्यक आहे.

यावेळी भूपाल पटवर्धन म्हणाले की, गेली १९ वर्षे फिल्म संग्रहालयाने सुरक्षित जतन केल्यामुळेच या माहितीपटाचे डिजिटायझेशन आता होऊ शकले आहे. संस्थेकडील अनेक दुर्मिळ ठेव्याचे डिजिटायझेशन सुरू आहे, त्याकरिता देखील चित्रपट संग्रहालयाचे सहकार्य आम्ही घेऊ इच्छितो. संस्थेच्या ज्ञानभारतम् केंद्राच्या समन्वयक डॉ. वीणा राज यांनी या माहितीपटाच्या डिजिटायझेशनकरिता पुढाकार घेतला होता, त्यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कवी आणि पुरस्कार्थींना व्यक्त होऊ द्यावे - विनोद अष्टुळ

■ हडपसर (दै. संध्या)



विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते आपले संपूर्ण जीवन तन-मन-धनाने समाजाच्या हितासाठी खर्च करत असतात, तसेच समाजाचा विवेकवादी आरसा दाखवण्याचे कार्य साहित्यिक, कवी आपल्या साहित्यातून करत असतात. अशा सामाजिक भान असणाऱ्या असामान्य व्यक्तींचे अनुभव उपस्थितांनी आवर्जून ऐकले पाहिजेत. केवळ आपली कविता सादर करून किंवा पुरस्कार घेऊन निघून जाऊ नये, या सर्वांकडे समाज आणि भाषा समृद्ध करणारे तसेच प्रेरणा देणारे महान अनुभव असतात, असे परखड मत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी, साहित्य सम्राटचे संस्थापक साहित्यिक विनोद अष्टुळ यांनी व्यक्त केले.

अश्वमेध पब्लिकेशन हाऊस आणि अश्वमेध आय.ए.एस. अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तक प्रकाशन, कवी संमेलन, नवदुर्गा सन्मान आणि काव्यरत्न सन्मान सोहळ्याचे आयोजन रामानंद कॉम्प्लेक्स, हडपसर येथे करण्यात आले होते. यावेळी पुढे मंचावरील मान्यवर आणि सन्मानार्थी यांनी आपापली थोडक्यात मनोगते व्यक्त केली. या सोहळ्याच्या मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक अशोक मोहिते, प्रमुख अतिथी साहित्य सम्राटचे संस्थापक विनोद अष्टुळ, सत्यशोधक रघुनाथ ढोक, संस्थापिका अध्यक्ष डॉ. अश्विनी काळे, सुप्रसिद्ध निवेदक संदीप रासकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात लेखिका ॲनेशा मुजुमदार लिखित 'द अनसोल्व्ड केसेस' या इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशनाने झाली. त्यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'नवदुर्गा पुरस्कार' देऊन तर साहित्य क्षेत्रातील मान्यवरांना 'काव्यरत्न पुरस्कारा'ने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सन्मान सोहळ्यानंतर झालेल्या बहारदार कवी संमेलनात सिद्धार्थ कुलकर्णी, रूपचंद शिरोई, अशोक मोहिते, रघुनाथ ढोक, अनिता क्षीरसागर, संगीता वानखेडे, डॉ. दिनेश खैरे, साक्षी माने, भरत माने, सुनिता वाघचौरे, निधी पालकर, श्रीकांत ढोबळे, चंद्रकांत चाबुकस्वार, डॉ. मनोज लडकत, जितेंद्र नगरकर, शांताराम भादवणकर, अनिता भोसले, श्रीराम साळवे, संदीप रासकर आणि विनोद अष्टुळ यांनी आपल्या काव्यरचना सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. संपूर्ण कार्यक्रमाचे सदाबहार सूत्रसंचालन संदीप रासकर यांनी केले, तर आभार आयोजिका डॉ. अश्विनी काळे यांनी मानले.

कॉर्पोरेट जगतात 'एक्सपिरियन्स डिझाइन'ची क्रांती

■ पुणे (दै. संध्या)



भारतातील कार्यस्थळे आणि व्यावसायिक आस्थापनांचे स्वरूप आता केवळ भौतिक संरचनेपुरते मर्यादित न राहता 'एक्सपिरियन्स डिझाइन'कडे वेगाने बदलत असून, संस्थेची संस्कृती आणि कर्मचाऱ्यांचा भावनिक अनुभव हा कॉर्पोरेट विश्वाचा मुख्य गाभा बनत आहे. 'सीबीआरई'च्या २०२६ मधील पाहणीनुसार ६५ टक्के कंपन्यांनी कार्यस्थळाचा अनुभव सुधारण्यासाठी ब्रँड आणि संस्कृतीवर आधारित डिझाइनला प्रथम प्राधान्य दिले आहे. या बदलत्या प्रवासात मोलाचे योगदान देणाऱ्या 'हॅपी स्पेसेस इंडिया' (Happy Spaces India) या अग्रगण्य एक्सपिरियन्स डिझाइन स्टुडिओने या क्षेत्रात आपल्या यशस्वी वाटचालीची १० वर्षे पूर्ण केली आहेत. ग्राहकांना केवळ वस्तू किंवा सेवा नव्हे, तर तिथे मिळणारा एकूण अनुभव हवा असतो, ही संकल्पना 'स्टारबक्स', 'पीव्हीआर आयनॉक्स', 'बस्टियन' आणि 'मिराज सिनेमा' यांसारख्या हॉस्पिटॅलिटी व मनोरंजन क्षेत्रातील आस्थापनांमध्ये प्रकर्षाने दिसून येते. आता हाच दृष्टिकोन कॉर्पोरेट कार्यालयांमध्येही लागू होत असून, नव्या पिढीतील कर्मचाऱ्यांना साध्या क्युबिकल्सऐवजी उत्साही वातावरण, कॅफे-शैलीतील मोकळ्या जागा आणि सर्जनशीलतेला चालना देणारी रचना हवी आहे. एक्सपिरियन्स डिझाइनच्या मागे मानसोपचारशास्त्र (Psychology), वर्तणूक शास्त्र (Behavioural Science) आणि मानवी संज्ञान (Human Cognition) यांचा सखोल अभ्यास असतो; ज्यामध्ये प्रकाश, रंग, ध्वनी आणि नैसर्गिक घटकांच्या साहाय्याने मानवी भावना आणि एकाग्रतेवर सकारात्मक परिणाम साधला जातो.

शेतकऱ्यांचा संपूर्ण डेटा एका क्लिकवर; नुकसानभरपाई, विम्याची प्रक्रिया होणार सुलभ

शेअर क्रॉपर्सतर्फे विकसित तीन डिजिटल प्लॅटफॉर्मचे सोमवारी (ता. १९) लोकार्पण; 'एफपीओ'ना पाच ट्रॅक्टर वितरित होणार

■ पुणे (दै. संध्या)



नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि पात्रतेच्या याद्यांमधील नोंदी यांसाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि माहितीवर आधारित करण्यासाठी पुण्यातील शेअर क्रॉपर्स प्रायव्हेट लिमिटेडने (एससीपीएल) डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांची जमीन, पिके, पेरणी, उत्पादन, खर्च आणि नुकसानीसंबंधी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे याचा सगळ्यात जास्त फायदा हा नुकसानभरपाई आणि विम्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक पुरावे संकलित करण्यासाठी होणार आहे. शेअर क्रॉपर्सच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संस्थापिका कृष्णा भट, सुधा ज्योती, संजय खत्री यांनी या उपक्रमाची माहिती दिली. कृष्णा भट म्हणाल्या, "प्रत्येक नैसर्गिक आपत्तीनंतर शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती गोळा करणे, पंचनामे करणे, कागदपत्रांची पडताळणी आणि पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करणे, अशा अनेक टप्प्यांतून जावे लागते. अनेकदा शेतकऱ्यांना आपल्या नावाची नोंद झाली आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये बऱ्याच फेऱ्या माराव्या लागतात. पण ही प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक नोंदींचे डिजिटल स्वरूपात एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. या प्रणालीमध्ये शेतजमीन, प्लॉट, पेरणी, पीकनिहाय माहिती, बियाणे व खतांची खरेदी, मजुरी, फवारणी, यंत्रसामग्री, सिंचन, उत्पादन, विक्री तसेच नफा-तोटा यांची सोप्या पद्धतीने नोंद ठेवता येणार आहे. त्यामुळे शेतीसंबंधी विविध माहिती आणि कागदपत्रे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याऐवजी ती एकाच डिजिटल व्यवस्थेत उपलब्ध होतील. या माहितीच्या आधारे शेतीचा खर्च कमी करणे, कर्ज किंवा विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सगळ्यात महत्त्वाचे पीक व्यवस्थापनाबाबत अधिक अचूक निर्णय घेणे शक्य होणार आहे."संजय खत्री म्हणाले,"या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात तीन डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यात येणार आहेत. यामध्ये 'स्वयंपूर्ण गाव विकास प्रकल्प पोर्टल' हे शेतकरी, शेतकरी मित्र, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), संस्था आणि सेवा भागीदारांना जोडणारे केंद्रीय व्यासपीठ असेल. 'खेत नायक' या मोबाइल ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीची स्थिती, खर्च, उत्पादन आणि विविध सेवांची माहिती पाहता येईल. तर 'किसान नायक' हे ॲप गावपातळीवर कार्यरत शेतकरी मित्रांसाठी असून, त्याद्वारे शेतकऱ्यांच्या नोंदी तयार करणे, त्यांची पडताळणी करणे आणि आवश्यक छायाचित्रे व कागदपत्रे जोडणे शक्य होणार आहे. या ॲपमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित स्मार्ट इनबॉक्सची सुविधाही असेल. शेतकऱ्यांना रेकॉर्ड ठेवण्याबाबत पुरेशी माहिती नसते, मात्र त्यामुळे त्यांचे अधिक नुकसान होते. या अपव्दारे हा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात गावांच्या शाश्वततेसाठी काम केले जाणार आहे. गेल्या काही वर्षात आपल्याकडे शेतकरी आत्महत्त्यांचे प्रमाण वाढले असून ते कमी करण्यासाठी या यंत्रणेचा चांगला उपयोग होईल. यामध्ये शेतकऱ्यांशी संबंधित सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केला असून शेतकऱ्यांना त्याचा निश्चितच फायदा होणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

मेटाचे नवे 'फेस्टिव्ह प्लेबुक'; पाच महिन्यांच्या व्यवसायवाढीची संधी



नवी दिल्ली : दैनिक संध्या

भारतातील सणासुदीच्या खरेदीचे स्वरूप झपाट्याने बदलत असून, दिवाळीपुरती मर्यादित असलेली खरेदी आता लग्नसराई, वर्षअखेरीचे उत्सव आणि प्रजासत्ताक दिनाच्या विक्री मोहिमांपर्यंत विस्तारत आहे. या बदलत्या परिस्थितीत ब्रँड्सना दिवाळीच्या उत्साहाचे दीर्घकालीन व्यवसायाच्या संधीत रूपांतर करता यावे, यासाठी मेटाने 'फेस्टिव्ह ॲक्सिलरेटर २०२६ : सीएमओ प्लेबुक' सादर केले आहे. ग्राहकांच्या बदलत्या खरेदीच्या सवयींचा अभ्यास आणि जाहिरात मोहिमांचे नियोजन यांचा समन्वय साधणारे हे मार्गदर्शक ब्रँड्सना संपूर्ण सणासुदीच्या हंगामात ग्राहकांशी जोडून राहण्यास मदत करणार आहे. सणासुदीच्या काळात ग्राहक आता समाजमाध्यमांवरील आशय निर्मात्यांकडून नवीन उत्पादनांची माहिती घेतात, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने खरेदीच्या कल्पना शोधतात आणि विविध सण तसेच ऑनलाइन विक्री मोहिमांदरम्यान खरेदी करतात. त्यामुळे केवळ मोठ्या विक्रीच्या दिवशी ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे पुरेसे राहिलेले नाही. खरेदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच मागणी निर्माण करणे, प्रत्येक सणाच्या वेळी ग्राहकांशी संवाद कायम ठेवणे आणि दिवाळीनंतरही विक्रीचा वेग टिकवून ठेवणे आवश्यक बनले आहे. मेटाच्या ई-कॉमर्स आणि किरकोळ व्यवसाय विभागाच्या भारतातील संचालक मेघना अप्पाराव म्हणाल्या, "सणासुदीची खरेदी आता अधिक सातत्यपूर्ण आणि गतिमान प्रवास बनली आहे. ग्राहक आधीपासूनच उत्पादनांचा शोध घेतात आणि नवीन कल्पना मिळवण्यापासून प्रत्यक्ष खरेदीपर्यंत सहज पोहोचतात. या प्रवासात आशय निर्माते आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका वाढत आहे. किरकोळ विक्रेते आणि ऑनलाइन व्यापार करणाऱ्या ब्रँड्ससाठी संपूर्ण सणासुदीच्या काळात ग्राहकांच्या पसंतीस उतरण्याची ही महत्त्वाची संधी आहे.

भाजपा महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा - परशुराम वाडेकर



पुणे : दैनिक संध्या

पुणे पदवीधर मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघातून *मा. कौस्तुभ मुरलीधर गावडे हे भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार असून, या दोन्ही उमेदवारांना पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत देऊन प्रचंड मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले. आज शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार्टी कार्यालयामध्ये प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शहर उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "महायुतीचे हे दोन्ही उमेदवार अत्यंत सक्षम आहेत. सर्व कार्यकर्त्यांनी घरोघरी, दारोदारी पोहोचून प्रचार करावा. पसंतीचे एक नंबरचे मत पदवीधर मतदार संघातुन डॉ. स्मिता जाधव आणि शिक्षक मतदार संघातून मा. कौस्तुभ गावडे एक नंबरचे पसंतीचे मत देऊन यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. येत्या २३ तारखेला महायुतीचा विजय नक्की होणार आहे." यावेळी त्यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्री नेते रामदासजी आठवले साहेब यांच्या आदेशानुसार पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी सर्व रिपब्लिकन पक्षाचे नगरसेवक आणि कार्यकर्ते कामाला लागले आहेत.



शिक्षकांचे प्रश्न तत्परतेने सोडविणारे कार्यकर्ते

पुणे : दैनिक संध्या

पुणे शिक्षक मतदार संघातून एकूण 30 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यात सुनील जगताप हे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या आंदोलनात सुनील जगताप यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून पाचही जिल्ह्यांमध्ये विविध शाळा महाविद्यालयांमधील शिक्षकांच्या भेटीगाठी घेण्याचे काम सुनील जगताप करत असून त्यांना शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुणे शिक्षक मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या उमेदवारांमध्ये सर्वाधिक काळ शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्परतेने काम करणारे शिक्षकांचे कार्यकर्ते म्हणून सुनील जगताप यांची ठसठशीत ओळख आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. शिक्षकांच्या आलेल्या एका फोनवर शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालक कार्यालय, शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी माध्यमिक,प्राथमिक या ठिकाणी जाऊन शिक्षकांचे प्रश्न सोडवण्याचे महत्त्वपूर्ण काम जगताप यांनी केले आहे. शिक्षकांना दिली जाणारी शालाबाह्य कामे, संच मान्यता,जूनी पेन्शन योजना यामुळे निर्माण झालेले प्रश्न, शिक्षकांवर लादलेली टीइटी परीक्षा,अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सुनील जगताप हे शिक्षक मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत .

जाहीर नोटीस

मी, श्री. शिरीष पोरेडी, वय: ५० वर्षे, धंदा : नोकरी, रा. सर्व्हे नं. १५०, १५१, १५२, ए-५८, म्हाडा घरकुल हौसिंग सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, पुणे ४११०१८ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी माझ्या वरील नमूद पत्त्यावर राहत आहे. माझ्या खरेदी मालकीची सर्व्हे नं.१५०, १५१, १५२, ए-५८, म्हाडा घरकुल हौसिंग सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, पुणे ४११०१८ ही आहे. सदर वर नमूद मिळकतीचे सोसायटीने मला शेअर सर्टिफिकेट दिले असून सोसायटी शेअर सर्टिफिकेट क्र. २८६ ते २९० पर्यंत भागपत्र क्र.५८ असा आहे. सदर सोसायटी शेअर सर्टिफिकेट हे माझ्या कडून माझ्या नजरचुकीने दि.१५/०९/२०२६ रोजी माझ्या राहत्या घरातून हरविले/गहाळ झाले आहे. सदर सोसायटी शेअर सर्टिफिकेटचा मी शोध घेतला असता ते मला कोठेही सापडले नाही. मी सोसायटी शेअर सर्टिफिकेटचा कोठेही गैरवापर केलेला नाही. तसेच सदर दस्त मी कोठेही गहाण अथवा तारण म्हणून ठेवला नाही. माझे मूळ सोसायटी शेअर सर्टिफिकेट मला सापडले तर मी त्याचा गैरवापर करणार नाही. तरी मला सोसायटी शेअर सर्टिफिकेट दुबार प्रत देण्यात यावी. यासाठी सदर सोसायटी शेअर सर्टिफिकेट हरविले बाबत मी संत तुकाराम नगर पोलीस स्टेशन मध्ये मिसिंग तक्रार दाखल करीत आहे. या कामी सदरचे प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

या प्रतिज्ञापत्रामध्ये जे कथन केले आहे, ते माझे माहिती व समजुतीप्रमाणे सत्य असून सदर माहिती असत्य आढळल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२९(२), २३६ व २३७ अन्वये योग्य त्या कलमाखाली शिक्षेस पात्र असेल याची मला जाणीव आहे. मी आज रोजी तारखेस पुणे मुक्कामी सही केली असे.

ठिकाण : पुणे
दिनांक : १९/१०/२०२६
शिक्का
प्रतिज्ञापत्र करणार
श्री. शिरीष पोरेडी

ऑलिम्पिकच्या स्वप्नापासून सूडाच्या प्रवासापर्यंत!

'दुनिया की ठयां ठयां'चा ट्रेलर प्रदर्शित

■ प्रेम, विश्वासघात आणि बदल्याच्या भावनेवर आधारित मालिका २२ ऑक्टोबरपासून प्राइम व्हिडिओवर विनामूल्य पाहता येणार

■ मुंबई (दै. संध्या)

एका तरुण नेमबाजाचे ऑलिम्पिकचे स्वप्न, प्रेमातील विश्वासघात आणि सूडाच्या भावनेतून बदलत जाणारे आयुष्य यांची उत्कंठावर्धक कथा घेऊन 'दुनिया की ठयां ठयां' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. प्राइम व्हिडिओने आपल्या आगामी एमएक्स ओरिजिनल मालिकेचा ट्रेलर प्रदर्शित केला असून, ही मालिका २२ ऑक्टोबर २०२६ पासून प्राइम व्हिडिओवर विनामूल्य पाहता येणार आहे.

सचिन पांडे यांच्या संकल्पनेतून आणि निर्मितीतून साकारलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन सुमित चावला यांनी केले असून, लेखनाची जबाबदारी नितीन केसवानी यांनी सांभाळली आहे. बॉम्बे शो स्टुडिओजची निर्मिती असलेल्या या मालिकेत ऋषभ जयस्वाल आणि दीपाली शर्मा प्रमुख भूमिकेत आहेत. राजकीय तणावाने ग्रासलेल्या शक्तीपूर शहराच्या पार्श्वभूमीवर ही कथा उलगडते.

मालिकेच्या प्रदर्शित झालेल्या ट्रेलरमध्ये विकास कुमार या महत्त्वाकांक्षी तरुण नेमबाजाच्या आयुष्यात घडणाऱ्या नाट्यमय घटनांची झलक पाहायला मिळते. विकासची भूमिका ऋषभ जयस्वाल यांनी साकारली आहे. ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विकासचे आयुष्य प्रेम आणि विश्वासघातामुळे पूर्णपणे बदलून जाते.

एका शक्तिशाली आमदाराची मुलगी वैष्णवी चतुर्वेदी हिला वाचवण्यासाठी विकास सर्वस्व पणाला लावतो. मात्र, या घटनेनंतर त्याला तुरुंगात जावे लागते. त्यानंतर न्यायालयात वैष्णवी त्याच्या विरोधात उभी राहते आणि विकासचा



तिच्यावरील विश्वास पूर्णपणे ढासळतो.

काही वर्षांनंतर दोघांचे मार्ग पुन्हा एकत्र येतात. मात्र, परिस्थिती बदललेली असते. वैष्णवी आता पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत असते आणि विकी भैय्याला न्याय मिळवून देण्याची जबाबदारी तिच्यावर सोपवली जाते. भूतकाळातील कटू आठवणी, तुटलेले नाते आणि सूडाची भावना यांमुळे दोघांमधील संघर्ष अधिक तीव्र होतो. विकास आणि विकी भैय्या या व्यक्तिरेखांमधील बदलांविषयी बोलताना ऋषभ जयस्वाल म्हणाला, "सुरुवातीला विकास हा स्पष्ट महत्त्वाकांक्षा असलेला तरुण असतो. त्याचा आपल्या कुटुंबावर विश्वास असतो आणि तो प्रेमावरही श्रद्धा ठेवतो. मात्र, त्याच्या आयुष्याचा पाया ढासळू लागल्यानंतर आशेची जागा राग, भ्रमनिरास आणि भूतकाळाला सामोरे जाण्याची गरज घेते. या व्यक्तिरेखेच्या वेगवेगळ्या पैलूंचा शोध घेणे हा माझ्यासाठी भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक अनुभव होता. त्याच्या असुरक्षितता, अंतर्गत संघर्ष आणि परिवर्तनाशी प्रेक्षक जोडले जातील, अशी आशा आहे." वैष्णवीची भूमिका साकारणाऱ्या दीपाली शर्मा म्हणाल्या, "वैष्णवीचे व्यक्तिमत्त्व विशेषाधिकार आणि सामर्थ्यामुळे घडलेले असले, तरी तिचा प्रवास दिसतो तितका सरळ नाही. विकाससोबतचे तिचे नाते तिच्या आयुष्यात अशा भावना आणि निर्णय घेऊन येते, ज्यांच्यापासून तिला सहजपणे दूर जाता येत नाही. प्रेम, संघर्ष आणि दृढनिश्चय यांच्या गुंतागुंतीतून तिची व्यक्तिरेखा पुढे जाते. तिचा वैयक्तिक भूतकाळ आणि वर्तमानातील जबाबदाऱ्या यांच्यातील संघर्ष तिचा प्रवास अधिक रंजक बनवतो." बॉम्बे शो स्टुडिओजचे निर्माते सचिन पांडे म्हणाले, "प्रेक्षकांच्या मनात दीर्घकाळ घर करून राहणाऱ्या कथा निर्माण करणे, हा आमचा प्रयत्न असतो. विश्वासघाताचा एक क्षण एखाद्याचे संपूर्ण आयुष्य कसे बदलू शकतो आणि त्यानंतर घेतलेले निर्णय व्यक्तिमत्त्वाला कसे आकार देतात, या विचारातून 'दुनिया की ठयां ठयां' साकारली आहे.

प्राइम व्हिडिओकडून उत्कंठावर्धक कथेला प्राधान्य

प्राइम व्हिडिओ इंडियाच्या जाहिरात-समर्थित मागणीनुसार उपलब्ध आशय विभागाचे संचालक आणि प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "दुनिया की ठयां ठयां ही प्रेम आणि विश्वासघात यांची टक्कर दाखवणारी हृदयस्पर्शी कथा आहे. ऋषभ जयस्वाल यांच्या प्रभावी अभिनयातून तीव्र भावना, गुंतागुंतीची नाती आणि सूडाची उत्कंठावर्धक कहाणी प्रेक्षकांसमोर येते. या मालिकेची ताकद तिच्या व्यक्तिरेखा, त्यांचे निर्णय आणि त्या निर्णयांमुळे कायमचे बदलणारे आयुष्य यात आहे."

फोनपेचे 'शेअर.मार्केट' 'फोनपे इन्व्हेस्ट'

■ मुंबई : (दै. संध्या)

PhonePe Invest

■ 'पोर्टफोलिओ ऑप्टिमायझर'च्या माध्यमातून गुंतवणुकीचे नियोजन, आढावा आणि पुनर्संतुलन करणे होणार अधिक सोपे

डिजिटल आर्थिक सेवा क्षेत्रातील फोनपेने आपल्या 'शेअर.मार्केट' या गुंतवणूक आणि समभाग व्यवहार मंचाचे नाव बदलून 'फोनपे इन्व्हेस्ट' असे करण्याची घोषणा केली आहे. या बदलामुळे गुंतवणूक मंच थेट फोनपेच्या ब्रँडअंतर्गत आला असून, गुंतवणूक सेवा अधिक व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचविण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. याचबरोबर कंपनीने 'पोर्टफोलिओ ऑप्टिमायझर' हे नवीन तंत्रज्ञानाधारित साधनही सादर केले आहे. फोनपेच्या देयक सेवा, कर्ज सुविधा, विमा आणि संपत्ती व्यवस्थापन सेवा यांना एकाच आर्थिक परिसंस्थेशी जोडण्याच्या धोरणाचा हा महत्त्वाचा भाग आहे. संशोधनावर आधारित गुंतवणूक सुविधा अधिक सहज उपलब्ध करून देणे आणि ग्राहकांना त्यांच्या गुंतवणुकीविषयी माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी मदत करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. फोनपे इन्व्हेस्टच्या माध्यमातून समभाग, प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री (आयपीओ), म्युच्युअल फंड आणि फ्युचर्स अँड ऑप्शन्स (एफ अँड ओ) यांसारख्या गुंतवणूक व व्यवहार सुविधांसोबत 'पोर्टफोलिओ ऑप्टिमायझर' उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे साधन गुंतवणूकदारांना आपला गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करणे, त्याचा आढावा घेणे आणि त्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी मदत करते. नव्याने गुंतवणूक सुरू करणाऱ्यांना मूलभूत मार्गदर्शन मिळावे, तसेच अनुभवी गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीचे अधिक सखोल विश्लेषण करता यावे, यासाठी या सुविधेची रचना करण्यात आली आहे. पोर्टफोलिओचे विश्लेषण, उपयुक्त माहिती आणि संशोधनाधारित श्रेणी ही या साधनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. सक्रिय गुंतवणूकदारांसाठी 'पोर्टफोलिओ ऑप्टिमायझर' स्वतंत्र फोनपे इन्व्हेस्ट अनुप्रयोगात उपलब्ध असेल.

फराह खान यांचा एडिट्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभाग

"सहजता, आपलेपणा आणि वास्तवातूनच उत्तम आशयाची निर्मिती"

■ मुंबई : (दै. संध्या)



"सहजता, आपलेपणा आणि वास्तवाशी जोडलेला आशय यांसोबत थोडासा विनोद असेल, तर प्रेक्षक त्याला मनापासून प्रतिसाद देतात," असे मत प्रसिद्ध चित्रपट निर्माती फराह खान यांनी व्यक्त केले. मुंबईत आयोजित एडिट्स फिल्म फेस्टिव्हलच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. या महोत्सवात उत्कृष्ट कथाकथन आणि प्रभावी चित्रफित संपादनासाठी इशांक गुप्ता, सान्या रोहिल्ला आणि अहसान वझीर यांना विजेते म्हणून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला फराह खान यांच्यासह महोत्सवाचे परीक्षक अहसास चन्ना, डॉली सिंग, निखिल तनेजा आणि राजीव मसंद तसेच शंभरहून अधिक आशय निर्माते उपस्थित होते. नव्या पिढीतील निर्मात्यांना सर्जनशील अभिव्यक्तीसाठी प्रोत्साहन देणे आणि चित्रफित संपादनाच्या माध्यमातून कथाकथनाच्या नव्या शक्यता शोधणे, हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. एडिट्स फिल्म फेस्टिव्हलसाठी ऑगस्ट महिन्यात प्रवेशिका स्वीकारण्यास सुरुवात झाली होती. पुढील ४५ दिवसांत सहभागी आशय निर्मात्यांना त्यांच्या कॅमेऱ्यातील मूळ, असंपादित चित्रफितींचा वापर करून नावीन्यपूर्ण कलाकृती तयार करण्याचे आवाहन करण्यात आले होते. यासाठी इन्स्टाग्रामच्या 'एडिट्स' या चित्रफित संपादन अनुप्रयोगाचा वापर करणे आवश्यक होते. महोत्सवात निवडण्यात आलेल्या कलाकृतींमधून कल्पकता, तांत्रिक कौशल्य आणि प्रभावी कथाकथनाचे दर्शन घडले. परीक्षकांनी निवडलेल्या अव्वल तीन कलाकृतींनी धाडस, संयम आणि संपादन कौशल्य यांचा उत्कृष्ट मेळ साधला. इशांक गुप्ता (@filmmaker.ishank), सान्या रोहिल्ला (@bunniestbunnytoeverbunny) आणि अहसान वझीर (@ahsan_vazir__) यांच्या कलाकृतींनी कथाकथनातील वैविध्य आणि संपादनाच्या सर्जनशील वापरामुळे विशेष लक्ष वेधून घेतले. अहसास चन्ना, डॉली सिंग, निखिल तनेजा आणि राजीव मसंद यांनी विजेत्यांची निवड केली. मेटा इंडियाचे जागतिक भागीदारी विभागाचे प्रमुख अंकित रिहाल म्हणाले, "आशय निर्मात्यांना योग्य साधने, व्यासपीठ आणि संधी उपलब्ध करून देणे हे आमच्या कार्याच्या केंद्रस्थानी आहे. या महोत्सवामुळे सर्जनशीलतेच्या नव्या शक्यता खुल्या झाल्या. निर्मात्यांना यापूर्वी न वापरलेल्या सुविधांचा प्रयोग करण्याची आणि वेगळ्या पद्धतीने कथा मांडण्याची संधी मिळाली.

एमजी विंडसरची 'इंडल्ज एडिशन' दाखल; आकर्षक रूपासह आरामदायी प्रवासाचा अनुभव

■ पुणे : (दै. संध्या)



जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने भारतातील लोकप्रिय विद्युत वाहन एमजी विंडसरची विशेष 'इंडल्ज एडिशन' सादर केली आहे. आकर्षक बाह्यरूप, प्रीमियम अंतर्गत सजावट आणि मागील आसनांवरील प्रवाशांसाठी अधिक सुविधा ही या नव्या आवृत्तीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक शैली आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव एकत्र आणण्याचा प्रयत्न या विशेष आवृत्तीत करण्यात आला आहे. एमजी विंडसर इंडल्ज एडिशनमध्ये ३८ किलोवॅट-तास क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. ही गाडी १०० किलोवॅट म्हणजेच १३६ पीएस शक्ती आणि २०० न्यूटन-मीटर टॉर्क निर्माण करते. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या वाहनाची प्रमाणित प्रवासक्षमता ३३२ किलोमीटर आहे. एमजी विंडसरच्या भविष्यकालीन रचनेला पुढे नेत इंडल्ज एडिशनमध्ये 'शॅंडो गोल्ड' रंगाची बॉडी आणि त्याला साजेशी काळ्या रंगाची छत अशी दोन रंगांची आकर्षक रचना देण्यात आली आहे. काळ्या रंगाचे बाह्य आरसे, १८ इंचांची काळ्या रंगातील मिश्रधातूची चाके आणि सी-पिलरवरील खास 'इंडल्ज' नाममुद्रा यांमुळे गाडीच्या प्रीमियम रूपात भर पडते. या विशेष रंगसंगतीमुळे वाहनाला स्वतंत्र ओळख मिळते. आकर्षक शैली आणि वेगळेपणाला महत्त्व देणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन ही आवृत्ती तयार करण्यात आली आहे. गाडीच्या आतील भागात अर्बन टॅन आणि काळ्या रंगाची आसनसजावट देण्यात आली आहे. पुढील आसनांच्या डोक्याला आधार देणाऱ्या भागावर 'इंडल्ज' नावाची खास भरतकाम केलेली अक्षरे आहेत. त्यामुळे या विशेष आवृत्तीचे वेगळेपण अधिक ठळक होते. प्रवाशांचा आराम वाढवण्यासाठी दुसऱ्या रांगेतील प्रवाशांना 'प्रिव्हे स्क्रीन' ही सुविधा प्रमाणित स्वरूपात देण्यात आली आहे. यामुळे मागील आसनांवर बसणाऱ्या प्रवाशांना मनोरंजनाचा अधिक चांगला अनुभव मिळू शकतो. याशिवाय, या आवृत्तीसोबत खास संकल्पनेवर आधारित कुशन आणि मानेसाठी उशांचाही समावेश करण्यात आला आहे.



लिव्हरपूल विद्यापीठाच्या बंगळुरू कॅम्पसचे उद्घाटन

■ बंगळुरू : (दै. संध्या)

ब्रिटनमधील प्रतिष्ठित लिव्हरपूल विद्यापीठाने बंगळुरू येथील आपल्या नव्या कॅम्पसचे अधिकृत उद्घाटन केले. कर्नाटकात कॅम्पस सुरू करणारे हे पहिले रसेल ग्रुप विद्यापीठ ठरले आहे. व्हाइटफिल्ड येथील अलेम्बिक सिटी परिसरात उभारण्यात आलेल्या या कॅम्पसमध्ये पहिल्या तुकडीतील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यातील उच्च शिक्षण, संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. उद्घाटन सोहळ्याला कर्नाटकचे मोठे व मध्यम उद्योग आणि पायाभूत सुविधा विकास मंत्री एम. बी. पाटील, लिव्हरपूल सिटी रिजनचे महापौर स्टीव्ह रॉदरम आणि लिव्हरपूल फुटबॉल क्लबचे दिग्गज खेळाडू तसेच विद्यापीठाचे माजी विद्यार्थी रॉबी फाउलर उपस्थित होते. कर्नाटकातील ब्रिटिश उपउच्चायुक्त हर्षबीर संघा, ब्रिटिश कौन्सिल इंडियाच्या संचालक ॲलिसन बॅरेट, शैक्षणिक भागीदार आणि विविध उद्योग क्षेत्रांतील मान्यवरांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. लिव्हरपूल विद्यापीठाच्या बंगळुरू कॅम्पसमध्ये सध्या संगणक विज्ञान, खेळ रचना, व्यवसाय व्यवस्थापन, लेखा व वित्त आणि जैववैद्यकीय विज्ञान या विषयांतील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक आणि जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा देण्यासाठी कॅम्पसमध्ये स्मार्ट वर्गखोल्या, विशेष प्रयोगशाळा, संशोधन व नावीन्यपूर्णतेसाठी आवश्यक सुविधा, सामूहिक कार्यासाठी केंद्रे आणि ब्लूमबर्ग टर्मिनल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या तीन शास्त्रज्ञांचा जागतिक स्तरावर गौरव

स्टॅनफोर्डच्या जगातील सर्वोच्च दोन टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत स्थान; सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय संशोधनातील योगदानाची दखल

■ पुणे (दै. संध्या)







डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी येथील तीन शास्त्रज्ञांचा स्टॅनफोर्ड विद्यापीठाशी संबंधित जगातील सर्वोच्च दोन टक्के शास्त्रज्ञांच्या प्रतिष्ठित यादीत समावेश झाला आहे. डॉ. सारिका चतुर्वेदी, डॉ. सचिन आत्रे आणि डॉ. अमिताव बॅनर्जी यांनी संशोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची या माध्यमातून जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे. या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानात महत्त्वाची भर पडली आहे. डॉ. सारिका चतुर्वेदी आणि डॉ. सचिन आत्रे यांचा २०२६ मधील संशोधन कामगिरीसाठी जगातील सर्वोच्च दोन टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत समावेश झाला आहे. तर कम्युनिटी मेडिसिन विभागाचे प्राध्यापक डॉ. अमिताव बॅनर्जी यांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीतील संशोधन योगदानासाठी या यादीत स्थान मिळाले आहे. डॉ. अमिताव बॅनर्जी यांची संशोधन कारकीर्द चार दशकांहून अधिक काळाची आहे. टायफॉइड, हिपॅटायटिस, श्वसनसंसर्ग आणि न्यूमोनिया यांसारख्या संसर्गजन्य आजारांवरील संशोधनात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विशेषतः आदिवासी भागांतील मलेरिया आणि विषाणूजन्य हिपॅटायटिसवरील संशोधनासाठी त्यांना विविध पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. संशोधन पद्धती, लोकसंख्याविषयक अभ्यास आणि नमुना निवड पद्धती यांमधील त्यांचे योगदानही उल्लेखनीय आहे. २००० ते २००४ या कालावधीत त्यांनी भारतीय सशस्त्र दलाच्या फिरत्या महामारी तपासणी पथकाचे नेतृत्व केले. २००५ मध्ये सशस्त्र दलातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यभार स्वीकारला. सध्या ते प्राध्यापक एमेरिटस म्हणून कार्यरत असून, विद्यापीठाच्या वैद्यकीय नियतकालिकाचे मुख्य संपादक म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांनी 'पीएलओएस वन' या संशोधन नियतकालिकाचे शैक्षणिक संपादक म्हणूनही काम केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजप युवा मोर्चा सज्ज

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी : आगामी पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने पिंपरी विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. आमदार प्रसाद लाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत निवडणुकीचे नियोजन, प्रचाराची रणनीती, मतदार नोंदणी आणि संघटनात्मक बांधणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या निवडणुकीत पुणे पदवीधर मतदारसंघातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. सौ. स्मिताताई जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघातील अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या विजयासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी केले. बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार अमित गोरखे यांनी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी बूथस्तरावर प्रभावी नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. प्रत्येक पदवीधर आणि शिक्षक मतदारापर्यंत पोहोचून राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती देण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. मतदार नोंदणी वाढवणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय राखणे आणि प्रचाराची प्रभावी आखणी करणे यासाठी सर्वांनी गांभीर्याने काम करावे, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीस पिंपरी विधानसभा प्रभारी आमदार प्रसाद लाड, सहप्रभारी आमदार स्नेहाताई दुबे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि पिंपरी-चिंचवड शिक्षक मतदारसंघ निवडणूक संयोजक सदाशिव खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पक्षाचे सरचिटणीस मोरेश्वर शेंडगे, सोनालीताई हिंगे आणि मधुकर बच्चे, शिक्षक व पदवीधर निवडणूक संयोजक राजेश पिल्ले, तसेच पिंपरी विधानसभा क्षेत्रातील मंडल अध्यक्ष धरम वाघमारे, अनिताताई वाळुंजकर, जयदीप खापरे आणि मंगेश धाडगे यांच्यासह भाजपचे प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, सरचिटणीस राहुल खाडे, प्रदेश सचिव सुमित घाटे, दिनेश काटे, गणेश सस्ते, साची दोशी, प्रसाद कस्पटे, राजेश डोंगरे, अजित कुलथे आणि सम्यक साबळे यांनी या बैठकीचे आयोजन केले होते. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने मतदार नोंदणीला गती देणे, संघटनात्मक ताकद वाढवणे आणि प्रभावी प्रचारयंत्रणा उभारणे या प्रमुख मुद्द्यांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी महायुतीचा मेळावा; निगडीत बैठक

पिंपरी : दैनिक संध्या

पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला गती देण्यासाठी सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) निगडी-प्राधिकरण येथे पुणे पदवीधर व शिक्षक मतदार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मिता योगेश जाधव आणि प्रा. कौस्तुभ मुरलीधर गावडे यांच्या प्रचाराची दिशा निश्चित करण्यासह पदवीधर व शिक्षक मतदारांशी संवाद साधण्यात येणार आहे. निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता हा मेळावा होणार आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर आण्णा मोहोळ आणि महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यास पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, माजी आमदार विलास लांडे, विधानपरिषद आमदार उमा खापरे आणि अमित गोरखे यांच्यासह महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) या पक्षांचे प्रमुख नेते, नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. पदवीधर आणि शिक्षक मतदारांपर्यंत महायुतीची भूमिका पोहोचविणे, निवडणुकीच्या प्रचाराचे नियोजन करणे आणि उमेदवारांच्या प्रचारासाठी सर्व घटकांमध्ये समन्वय साधणे, हा मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे. या बैठकीच्या माध्यमातून आगामी निवडणुकीच्या प्रचाराचे नियोजन आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. महायुतीच्या सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच संबंधितांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष योगेश मंगलसेन बहल यांनी केले आहे.

संत तुकाराम नगर प्रभाग क्र. २० मध्ये शिवसेनेची 'घोंगडी बैठक' उत्साहात

पिंपरी: दैनिक संध्या

शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी पिंपरी विधानसभा क्षेत्रातील संत तुकाराम नगर प्रभाग क्रमांक २० येथे आयोजित करण्यात आलेली 'घोंगडी बैठक' टप्पा ०८ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पक्षाचा विस्तार, युवकांना संघटनेशी जोडणे आणि शिवसेनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासह नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीला शिवसेनेचे महानगरप्रमुख राजेश किसनराव फलके आणि युवासेनेचे जिल्हाप्रमुख सागर पाचर्णे यांची प्रमुख उपस्थिती होती. युवासेनेचे महानगरप्रमुख संतोष म्हात्रे तसेच प्रभाग क्रमांक २० मधील शिवसेना आणि युवासेनेच्या आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बैठकीचे नियोजन केले. यावेळी युवतीसेनेच्या शहरप्रमुख श्वेता कापसे, शिवसेना सोशल मीडियाच्या शहरप्रमुख तेजश्री ढोरे-पाटील, शिवसेनेचे भोसरी विधानसभा प्रमुख गणेश जाधव, शिवसेना महिला आघाडीच्या उपशहरप्रमुख स्वीटी मलातपुरे, भोसरी विधानसभा समन्वयक विद्यासागर गायकवाड, युवासेनेचे विभागप्रमुख चांद पटेल, नीलम म्हात्रे, मनीषा वाघमारे, सागर चव्हाण, अमित फलके, राज काची, निलेश मलातपुरे आणि युवासेनेचे पिंपरी विधानसभा संपर्कप्रमुख राजीव मेनन यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बैठकीदरम्यान संघटनेचा विस्तार करणे, पक्षाची विचारधारा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, अधिकाधिक युवकांना आणि नागरिकांना शिवसेनेशी जोडणे तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटनात्मकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर देण्यात आला. नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांना योजनांचा प्रभावीपणे लाभ मिळवून देणे, जनसामान्यांच्या समस्या जाणून घेणे आणि शिवसेनेचे कार्य प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे महानगरप्रमुख राजेश फलके यांनी सांगितले. संघटना अधिक सक्षम व मजबूत करण्यासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

बीआरटी बॅरिकेड्सच्या स्वच्छतेसाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर



■ पिंपरी : (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यावरील बीआरटीएस बॅरिकेड्स आणि दुभाजकांची स्वच्छता करण्यासाठी महापालिकेच्या मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्रांत (एसटीपी) प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर केला जात आहे. त्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर केला जात नाही.

पावसाळ्यामुळे रस्त्यावरील चिखल, माती व धूळ बॅरिकेड्स व दुभाजकांवर साचल्याने ते वाहनचालकांना स्पष्टपणे दिसावेत म्हणून रस्ते सुरक्षेसाठी हे काम केले जात आहे, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. बीआरटी बॅरिकेड्सला स्कूल बसची धडक झाल्याची घटना नुकतीच घडली होती. अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर बॅरिकेड्स व दुभाजकांची दृश्यता कायम ठेवणे. संभाव्य धोकादायक ठिकाणांची स्वच्छता करणे, हे उपाय महापालिका करीत आहे. जानेवारी 2027 मध्ये होणाऱ्या पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या तयारीसोबत नियमित देखभालीलाही प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी बीआरटी मार्गांची स्वच्छता व देखभाल करण्यात येत आहे.

बॅरिकेड्स व दुभाजकांची स्वच्छता ही केवळ स्पर्धेपुरती किंवा शहराच्या सुशोभीकरणापुरती मर्यादित नाही. दैनंदिन प्रवास करणारे नागरिक, शालेय वाहने, सार्वजनिक वाहतूक व इतर वाहनचालकांसाठी रस्त्यावरील संरक्षकव्यवस्था स्पष्टपणे दिसणे, हा उद्देश आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुष्काळ परिस्थिती आणि पाणीकपात तसेच रस्त्यांची आवश्यक स्वच्छता व सुरक्षिततेची कामेही करणे आवश्यक आहे. या दोन्ही बाबींचा विचार करून महापालिका एसटीपीत प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करीत आहे. शहरातील लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था, हौसिंग सोसायट्या या पाणीटंचाई व त्यावरील आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सहकार्य करीत आहेत. पाणी बचत तसेच पाण्याचा पुनर्वापर करणाऱ्या हौसिंग सोसायट्यांना महापालिका सन्मानित करणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा. महापालिकेच्या स्वच्छता व रस्ते सुरक्षिततेच्या कामांना सहकार्य करावे.

बॉसच्या व्हॉट्सॲपवरून मेसेज अन् खात्यातून पैसे गायब

■ पिंपरी (दै. संध्या)

'मी महत्त्वाच्या मीटिंगमध्ये आहे. एका व्यक्तीला तातडीने पैसे पाठवायचे आहेत. दिलेल्या बँक खात्यावर रक्कम ट्रान्स्फर करा,' असा मेसेज थेट बॉसच्या व्हॉट्सॲपवरून येतो. वरिष्ठांचा आदेश असल्याने कर्मचारी खातरजमा न करता पैसे पाठवतात. मात्र, काही वेळाने प्रत्यक्ष बॉसशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी असा कोणताही मेसेज पाठवला नसल्याचे समोर येते. तोपर्यंत रक्कम सायबर चोरट्यांच्या खात्यात जमा झालेली असते. सायबर गुन्हेगारीतील या पद्धतीला 'बॉस फ्रॉड' किंवा 'सीईओ फ्रॉड' म्हटले जाते. फसवणूक करण्याच्या या प्रकारामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांनी खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

सायबर चोरटे सुरुवातीला कंपनीचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डिजिटल संपर्क व्यवस्थेत शिरकाव करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी रिझर्व्ह बँक, कंपनी व्यवहार मंत्रालय किंवा अन्य सरकारी यंत्रणेच्या नावाने बनावट ई-मेल अथवा संदेश पाठवले जातात. त्यासोबत महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे भासवून झिप फाइल जोडलेली असते. संबंधित व्यक्तीने संगणकावर ही फाइल उघल्यास मालवेअरच्या माध्यमातून संगणकावरील व्हॉट्स ॲप वेब चोरट्यांच्या ताब्यात जाते. त्यामुळे प्रत्येक प्रकरणात बॉसचा मोबाईल प्रत्यक्ष हॅक झालेला असतोच असे नाही. संगणकावरील व्हॉट्स ॲप वेब ताब्यात घेऊनही फसवणूक केली जाऊ शकते. वरिष्ठांच्या व्हॉट्स ॲप खात्यात प्रवेश मिळाल्यानंतर चोरटे कार्यालयातील आर्थिक व्यवहार हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड करतात. पुरवठादाराचे बिल थकले आहे, कंपनीचा महत्त्वाचा व्यवहार अडकला आहे किंवा तातडीने रक्कम जमा करणे आवश्यक आहे, अशी कारणे पुढे केली जातात. त्यासाठी वेगवेगळ्या बँक खात्यांचे तपशील पाठवले जातात. व्यवहार गोपनीय ठेवण्यास सांगणे, फोनवर बोलण्यास टाळाटाळ करणे आणि ठराविक वेळेत पैसे पाठविण्याचा आग्रह धरणे, अशा पद्धतीने कर्मचाऱ्यांवर दबाव आणला जातो. काही प्रकरणांत एकाच वेळी संपूर्ण रक्कम न मागता वेगवेगळ्या खात्यांवर टप्प्याटप्प्याने पैसे जमा करण्यास सांगितले जाऊ शकते.

पिंपरी-चिंचवडमध्ये कचऱ्याचे गणित बिघडले; रोजच्या संकलनात ६०० टनांची तफावत

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज 1 हजार 500 टन कचरा जमा होतो. मात्र, सध्या सुमारे 2 हजार 100 टन कचरा गोळा केला जात आहे. वजन आणि फेरीनुसार महापालिकेकडून ठेकेदारांना बिले दिली जातात. कचरा डेपो बंद असल्याने साचलेला कचरा अजूनही उचलण्याचे काम केले जात असल्याने कचऱ्याचे वजन वाढल्याचा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. तर, वजन वाढवण्यासाठी शहराच्या सीमेवरील भागांतील कचरा गोळा केला जात असल्याचा आरोप केला जात आहे. शहराची लोकसंख्या 30 लाखांपुढे गेली असून, शहरात दररोज 1 हजार 500 टन ओला व सुका असा कचरा जमा केला जातो. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत घरोघरचा कचरा गोळा करणे, मोशी कचरा डेपोपर्यंत त्याची वाहतूक करणे या कामासाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड आणि ॲन्टोनी लारा ठेकेदार कंपन्यांना काम दिले आहे. मात्र, सध्या शहरातील काही भागात कचरा संकलनाचे कामकाज विस्कळीत झाले आहे. कचरा संकलन करून मोशी येथे कचरा डंम्प केला जातो. डेपोत कचऱ्यावर कॅपिंग, लॅण्ड फिलिंग अर्थात शास्त्रीय भूभरण, यांत्रिकी खत प्रक्रिया, गांडूळ खत प्रकल्प, वेस्ट टू एनर्जी, सीएनजी निर्मिती अशा माध्यमातून कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. आठ जुलैच्या दुर्घटनेपासून वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद आहे.

तसेच, बायोमायनिंग केले जात आहे. असे असूनही, डेपोतील कचरा कमी होण्याऐवजी वाढतच आहे. मोशी डेपोत 8 जुलैला झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर शहरात कचरा समस्या निर्माण झाली आहे.

शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग तयार झाले आहे. सध्या शहरात जमा झालेले ढीग डेपोत नेऊन टाकला जात आहे. त्यामुळे कचऱ्याचे वजन वाढल्याचे दावा आरोग्य विभागाने केला आहे. शहरात दररोज 1 हजार 500 टन कचरा जमा होतो, असे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे. मात्र, महापालिकेच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालात 1 हजार 800 टन कचरा गोळा होतो, असा दावा पर्यावरण सद्यस्थिती अहवालात करण्यात आला आहे. तर आता प्रत्यक्षात 2 हजार 100 टन कचरा जमा होत असल्याची माहिती समोर आली आहे. कचऱ्याच्या वजनाच्या आकडा प्रत्येक विभागाकडून वेगवेगळा आहे. तसेच, ठेकेदारांनी त्यांच्या भागात कचरा संकलनाचा उपठेका दिला आहे. यामुळे उपठेकेदारांना जगविण्यासाठी शहराबाहेरील कचरा जमा करून वजन वाढले जात आहे, असा आरोप केला जात आहे. घरोघरचा कचरा जमा गोळा करून घंटागाडीद्वारे संकलन केंद्रांवर आणला जातो. शहरात 28 कचरा संकलन केंद्र आहेत. तेथून तो कचरा कॅप्सूल वाहनांतून मोशी डेपोत नेऊन टाकला जातो. एकूण 520 वाहनांद्वारे कचऱ्याची वाहतूक केली जाते.

मात्र, यातील काही वाहनांचे आयुर्मान संपले असतानाही वापर होत असल्याचे धक्कादायक चित्र आहे. विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या एकूण 34 वाहनांच्या मालकांना एकूण दीड लाख दंड करण्यात आला आहे. अशा वाहनांवर तसेच, ठेकेदारांवरही महापालिकेकडूनही कारवाई केली जाईल, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.

पिंपळे गुरवमध्ये उतारावरून बस सरकली; कंट्रोल केबिन आणि बसथांब्याच्या शेडला धडक

■ पिंपळे गुरव(दै. संध्या)



बसचालकाने उभी केलेली बस अचानक उतारावरून पुढे सरकली आणि थेट कंट्रोल केबिन व बसथांब्याच्या शेडला धडकली. शनिवारी (दि. १८) दुपारी पावणेएकच्या सुमारास घडलेल्या या घटनेत बसचे, कंट्रोल केबिनचे आणि शेडचे मोठे नुकसान झाले. एका युवकाला किरकोळ दुखापत झाली. बसथांब्याजवळ प्रवासी बसची वाट पाहत असतात.

मात्र, सुदैवाने अपघाताच्या वेळी प्रवासी आणि कंट्रोल केबिनमधील दोन ते तीन कर्मचारी बाहेर असल्याने मोठी जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार, या बसस्थानकातून मार्केट यार्ड, वारजे माळवाडी आणि शेवाळवाडी या मार्गांवर बसेस धावतात. दुपारी पावणेएकच्या सुमारास चालकाने बस कडेला उभी केली. त्यानंतर तो वाहकासोबत जेवणासाठी गेला. दरम्यान, बस उभी असलेल्या ठिकाणच्या उतारामुळे किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे बस अचानक पुढे सरकली. चालकाचे नियंत्रण नसल्याने बस थेट कंट्रोलरच्या केबिनला आणि बस थांब्याच्या शेडला जाऊन धडकली. या धडकेत बसच्या काचा फुटल्या, तर केबिन आणि शेडचेही नुकसान झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे बसस्थानक परिसरात एकच धावपळ उडाली. बस उभी करताना हँडब्रेक लावणे, योग्य ठिकाणी वाहन पार्क करणे आणि आवश्यक सुरक्षा उपायांचे पालन करणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. अशा दुर्घटना टाळण्यासाठी बसचालकांनी अधिक दक्षता घ्यावी आणि प्रशासनाने वाहन पार्किंगच्या सुरक्षेची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर संबंधित प्रशासनाकडून घटनास्थळाची पाहणी करण्यात आली. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याची चौकशी करून कारवाई होणे अपेक्षित आहे. कंट्रोल केबिनच्या शेजारीच बस थांबा असल्याने तेथे अनेक प्रवासी बसची वाट पाहत बसलेले असतात. तसेच, केबिनमध्येही कर्मचारी कार्यरत असतात. अपघाताच्या वेळी प्रवासी आणि केबिनमधील दोन ते तीन कर्मचारी बाहेर असल्याने ते या दुर्घटनेतून बचावले. बसच्या मार्गात प्रवासी असते, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

पिंपरी-चिंचवडमध्ये कामासाठी पहाटेपासून गर्दी

■ पिंपरी (दै. संध्या)

वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, चिंचवडेनगरसह शहरातील अन्य भागांत दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतून तसेच ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर तरुण, कामगार शहरात येत आहेत.

गावाकडे खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाल्याने मजूरवर्ग मोठ्या प्रमाणात पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दाखल होत आहे. चिंचवड, बिजलीनगर आदी भागांतील मजूर अड्ड्यांवर पहाटेपासूनच कामगारांची गर्दी पाहायला मिळत आहे. प्रशांत महासागरातील एल निनोच्या वाढता प्रभाव आणि दक्षिण आशियातील तीव्र उष्णतेच्या हंगामाची शक्यता यामुळे आरोग्य व्यवस्थेसमोर आव्हान उभे राहिले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी भारत-बांगलादेश- नेपाळ -आणि भूतान या चार देशांनी एकत्रित पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थिती शेतातील घटलेला रोजगार आणि वाढती बेरोजगारी यामुळे रोजगारांच्या शोधात शहराकडे येणाऱ्या कष्टकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाल्हेकरवाडी -चिंचवड- बिजलीनगर परिसरातील विविध मजूर अड्ड्यांवर पहाटेपासून कामाच्या अशाने जमलेल्या मजुरांची गर्दी पाहायला मिळते. मात्र, प्रत्येकाच्या हाताला काम मिळेलच याची कोणतीही शास्वती नसल्याने अनेकांना संध्याकाळी रिकाम्या हाताने घराकडे परतावे लागते.

बिजलीनगर मजूर अड्ड्यावर बीड, उस्मानाबाद, सोलापूर, कर्नाटक, लातूर, परभणी, नांदेड, विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेले कामगार मोठ्या संख्येने दिसतात. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातून आलेले अकुशल कामगारही येथे रोजगाराच्या शोधात दाखल झाले आहेत. बांधकाम क्षेत्रातील खोदाई, भराई, माती, वाळू व विटा उचलणे, मालवाहतूक, अवजड साहित्य हलवणे, रंग कामासाठी मदत करणे, प्लंबिंगच्या कामात कारागिरांना हातभार लावणे, अशा मिळेल त्या अंगमेहनतीच्या कामातून कष्टकरी कुटुंबांचा उदरनिर्वाह करत आहेत.

खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी २६ वर्षांनी जेरबंद, नाव बदलून पवनानगरमध्ये राहत होता

■ लोणावळा (दै. संध्या)

खुनाच्या गुन्ह्यात तब्बल २६ वर्षांपासून फरार असणाऱ्या एका मोस्ट वाँटेड आरोपीच्या लोणावळा ग्रामीण पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. चाकण पोलिस ठाण्याच्या हद्दीत २६ वर्षांपूर्वी घडलेल्या खूनप्रकरणातील आरोपी नाव बदलून पवनानगर भागात लपून राहिला होता. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे ही धडक कारवाई केली.

३० जुलै २००० रोजी रात्री १०.१५ वाजताच्या सुमारास मौजे सोळबंद आंबेठाण (ता. खेड, जि. पुणे) येथे आरोपी निवृत्ती दौलत जाधव (वय ३१, रा. सोळबंद आंबेठाण) याने आपल्या राहत्या घरी मामी (सासू) लक्ष्मीबाई वाघमारे यांच्यासोबत झालेल्या भांडणाच्या कारणावरून त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांचा खून केला होता. या प्रकरणी चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यानंतर आरोपी निवृत्ती जाधव हा गेल्या २६ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाला होता.

दरम्यान, लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक नाथा केकाण यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी निवृत्ती दौलत जाधव हा आंबेगाव (पो. पवनानगर, ता. मावळ, जि. पुणे) येथे राहत आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठांच्या आदेशानुसार पोसई नाथा केकाण, पोलिस हवालदार प्रशांत तुरे आणि पोलिस नाईक/शिपाई मनोज मोरे यांचे पथक तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले.

आरोपी हा स्वतःचे अस्तित्व, नाव व पत्ता बदलून अत्यंत चलाखीने राहत होता. परंतु, पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे अथक परिश्रम घेऊन सापळा रचत त्यास शिताफिने ताब्यात घेतले आणि त्याच्या मुसक्या आवळल्या. सदरची उल्लेखनीय कामगिरी पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक शुभम कुमार, लोणावळा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन टोम्पे, ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलिस उप-अधीक्षक भूषण माने आणि सहा. पोलिस निरीक्षक विजया म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या धडक कारवाईत पोलिस उपनिरीक्षक नाथा केकाण, पोलिस हवालदार जय पवार, प्रशांत तुरे, प्रणयकुमार उकिर्डे, पोलिस शिपाई मनोज मोरे आणि होमगार्ड भीमराव वाळुंज यांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा तपास पूर्ण केल्यानंतर आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी चाकण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. राज्यात फरार व पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधार्थ विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलिस उप-अधीक्षक भूषण माने आणि महिला सहायक पोलिस निरीक्षक विजया म्हेत्रे यांनी गुन्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेऊन तो लवकरात लवकर जेरबंद करण्याबाबत पोलिसांच्या पथकाला विशेष सूचना व मार्गदर्शन केले होते.

चाकण उद्योग नगरीत खंडेनवमी उत्साहात साजरी

■ चाकण (दै. संध्या)

औद्योगिक क्षेत्रात वाहन विक्री आणि वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या चाकण येथील ऑटोबान ट्रकिंग भारतबेंज या बहुराष्ट्रीय कंपनीसह चाकण उद्योग नगरीत पारंपरिक पद्धतीने खंडेनवमीचा सण मोठ्या उत्साहात, आनंदात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीत श्रम, कौशल्य आणि कार्यसाधनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी खंडेनवमीला विशेष महत्त्व आहे. याच परंपरेचे पालन करत कंपनीच्या शोरूम आणि वर्कशॉपमधील यंत्रे, अवजारे तसेच वाहनांचे विधिवत पूजन करण्यात आले. या सोहळ्यामुळे कंपनीच्या परिसरात उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.



खंडेनवमी हा केवळ धार्मिक विधी नसून आपल्या दैनंदिन कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या साधनांप्रती आदर व्यक्त करण्याचा आणि आगामी काळात यश, सुरक्षितता व समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना करण्याचा दिवस मानला जातो. याच भावनेतून ऑटोबान ट्रकिंग – भारतबेंझच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीच्या शोरूमपासून वर्कशॉपपर्यंत सर्वत्र सणाचा उत्साह पाहायला मिळत होता.

कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, व्यवस्थापनातील प्रतिनिधी, सुपरवायझर, कामगार आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कंपनीचे एचआर सचिन गजकोश, वर्कशॉप मॅनेजर विवेक, ॲडमिन अविनाश वाघचौरे आणि सुपरवायझर युवराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली खंडेनवमीचा पूजन सोहळा पार पडला. यावेळी शोरूम आणि वर्कशॉपमधील कामकाजासाठी वापरण्यात येणारी यंत्रे, विविध प्रकारची अवजारे आणि भारतबेंझची वाहने यांचे पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले.

विधिवत पूजा करून कंपनीच्या कामकाजात सातत्याने प्रगती व्हावी, कर्मचाऱ्यांना सुख-समाधान लाभावे आणि आगामी काळात कंपनीने यशाची नवनवीन शिखरे गाठावीत, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली. रांगोळी आणि फुलांच्या सजावटीने परिसराला मंगलमय स्वरूप आले होते. खंडेनवमीच्या निमित्ताने कंपनीच्या आवारात तसेच वर्कशॉप परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. फुलांच्या सजावटीमुळे संपूर्ण परिसराला सणासुदीचे सुंदर आणि प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. पूजेसाठी आवश्यक तयारी करण्यात आली होती. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने या सोहळ्यात सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. दैनंदिन कामकाजात व्यस्त असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांना या निमित्ताने एकत्र येऊन पारंपरिक सण साजरा करण्याची संधी मिळाली. कामाच्या ठिकाणी धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच परस्परांमधील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. मिठाई वाटपातून आनंदाची देवाणघेवाण करण्यात आली.

पूजन सोहळा संपन्न झाल्यानंतर उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांना मिठाईचे वाटप करण्यात आले. एकमेकांना खंडेनवमीच्या शुभेच्छा देत सर्वांनी सणाचा आनंद लुटला. या प्रसंगी कंपनीच्या प्रगतीसाठी, व्यवसायातील यशासाठी आणि सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. कंपनीच्या कामकाजात प्रत्येक विभागाचे योगदान महत्त्वाचे असते. शोरूममधील कामकाजापासून ते वर्कशॉपमधील तांत्रिक सेवा आणि वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीपर्यंत प्रत्येक कर्मचारी आपापली जबाबदारी पार पाडत असतो. अशा सणांच्या माध्यमातून सर्वांना एकत्र आणणे, सामूहिक भावना दृढ करणे आणि कामांप्रती सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, हे या सोहळ्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरले.

परंपरेचा सन्मान आणि प्रगतीची नवी उमेद : भारतीय संस्कृतीमध्ये खंडेनवमीला श्रमसंस्कृती, कार्यसाधनांचे पूजन आणि नव्या संकल्पांचा दिवस म्हणून विशेष महत्त्व आहे. आपल्या कामात उपयोगी पडणाऱ्या साधनांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. उद्योग, व्यवसाय आणि तांत्रिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठीही या सणाला विशेष महत्त्व आहे. ऑटोबान ट्रकिंग भारतबेंझ, चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात धार्मिक परंपरेसोबतच एकोपा, सहकार्य आणि कंपनीच्या उज्ज्वल भविष्यासाठीची सकारात्मक भावना अनुभवायला मिळाली. अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांच्या सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला. अशा उपक्रमांमुळे कामाच्या ठिकाणी सांस्कृतिक परंपरांचे जतन होण्यासोबतच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधील स्नेहसंबंध अधिक दृढ होण्यास मदत होते. खंडेनवमीच्या या मंगलमय पर्वानिमित्त ऑटोबान ट्रकिंग भारतबेंझच्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांनी कंपनीच्या आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. पारंपरिक पूजन, आकर्षक सजावट, मिठाई वाटप आणि सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ऑटोबान ट्रकिंग, भारतबेंझ, चाकण येथील खंडेनवमी सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

थोडक्यात पण महत्वाचे

आळंदीत भाविकांसाठी 'अमृत स्तंभ'; २० रुपयांत शुद्ध पाण्याने तीर्थस्नानाची सुविधा



आळंदी : दैनिक संध्या

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी देशभरातून आळंदीत येणाऱ्या भाविकांना इंद्रायणी नदीच्या प्रदूषित पाण्यामुळे तीर्थस्नानापासून वंचित राहावे लागत होते. भाविकांची ही अडचण दूर करण्यासाठी आळंदी नगर परिषदेने नदीघाटावरच 'अमृत स्तंभ' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या सुविधेद्वारे अवघ्या २० रुपयांत शुद्ध पाण्याने स्नान करता येत असल्याने भाविकांना दिलासा मिळाला आहे. इंद्रायणी नदीला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असून, आळंदीत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी नदीस्नानाला विशेष श्रद्धास्थान आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून नदीत मिसळणाऱ्या सांडपाण्यामुळे नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी, नदीच्या पाण्यात स्नान करणे भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय ठरत होता. ही बाब लक्षात घेऊन नगर परिषदेने नदीघाटावरच पाणी शुद्ध करून स्नानासाठी उपलब्ध करून देण्याचा पर्याय पुढे आणला आहे. भोसरी येथील दर्शन इंडस्ट्रीज इंटरनॅशनल प्रा. लि. या कंपनीने 'अमृत स्तंभ' ही यंत्रणा विकसित केली आहे. कंपनीचे संचालक सी. पी. ठक्कर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या यंत्रणेत पाणी शुद्ध करण्यासाठी आठ प्रकारचे फिल्टर बसविण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने साधारण सहा मिनिटांत १८ लिटर पाणी शुद्ध केले जाते. शुद्ध केलेले पाणी शॉवरद्वारे स्नानासाठी उपलब्ध करून दिले जाते. यंत्रणेची उभारणी, देखभाल-दुरुस्ती आणि आवश्यक मनुष्यबळाची व्यवस्था संबंधित कंपनीकडून केली जाते. या सुविधेचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच नदीच्या पाण्यात उतरून स्नान करणे शक्य नसलेल्या भाविकांना विशेष लाभ होत आहे. महिला भाविकांसाठी कपडे बदलण्याची स्वतंत्र व्यवस्थाही करण्यात आली आहे. धार्मिक श्रद्धा जपत भाविकांना स्वच्छ पाण्याने स्नानाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि घाटावरील गैरसोय कमी करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले.

दिवाळी फराळाचे पदार्थ परदेशात पाठविण्यासाठी पोस्ट ऑफिस सज्ज

बारामती : दैनिक संध्या

परदेशातील नातेवाईकांना दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेता यावा यासाठी टपाल विभाग सज्ज असून बारामती टपाल विभागाने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित फराळाचे पदार्थ माफक दरात परदेशात पाठविण्याची पार्सल सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून टपाल कार्यालयामध्ये येऊ शकत नाहीत अशा नागरिकांसाठी घरी येऊन फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी पोस्टमन घरी येऊन फराळाच्या पदार्थांचे पार्सल विनामूल्य घेऊन जातील. नोकरी आणि शिक्षणानिमित्त बारामती, इंदापूर, दौंड, सासवड, शिरूर येथून परदेशामध्ये जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. परदेशामध्ये वास्तव्यास असलेल्या प्रत्येकालाच दिवाळीच्या सणासाठी भारतामध्ये आणि आपल्या घरी येणे शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन जगभरातील प्रियजनांना फराळाचे पदार्थ आणि भेटवस्तू पाठवून त्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी बारामती टपाल विभागाने हे पार्सल परदेशात पोहोचविण्याची सुविधा दिली आहे. या सेवेचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा. अधिक माहितीसाठी ९०९६५४४९९९, ९९६०५८८६९९, ८००७७९७५९५, ७५८८२३०२७०, ९१३०९६२८२७ या क्रमांकावर सकाळी ९ ते संध्याकाळी ७ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन बारामती विभागाचे डाक अधीक्षक केतन शित्रे यांनी केले आहे.

बारामतीत अटकावलेल्या बेवारस वाहनांचा होणार जाहीर लिलाव

बारामती : दैनिक संध्या

बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने मोटार वाहन कर कायद्यान्वये जप्त करण्यात आलेली तसेच विविध कारणांमुळे कार्यालयाच्या आवारात अटकावून ठेवण्यात आलेली बेवारस वाहने व वाहनांचे सुटे भाग यांचा भंगार म्हणून जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. जप्त केलेली वाहने तसेच विविध कारणांमुळे अटकावून ठेवलेली वाहने कार्यालयाच्या परिवहन कार्यालयाच्या आवारात उभी आहेत. या वाहनांमध्ये काही वाहनांची अवस्था खराब झाली असून, ती वापरण्यायोग्य राहिलेली नाहीत. काही वाहनांमधून पेट्रोल व डिझेलची गळती होऊन आग लागण्यासारख्या दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने ही वाहने भंगार म्हणून लिलावात काढण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित वाहनांचे मालक, व्यक्ती, संस्था अथवा मालकी हक्क सांगणाऱ्यांनी वाहनांबाबतचे आवश्यक पुरावे व कागदपत्रांसह ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथे संपर्क साधावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे.

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे स्मृती प्रित्यर्थ वृद्धाश्रमास धान्य वाटप

■ चाकण (दै. संध्या)



खेड तालुक्याचे आमदार व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या स्मृती दिनानिमित्त स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज यांच्या वतीने स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या स्मरणार्थ मूठभर धान्य अभियान अंतर्गत वृद्धाश्रमास धान्य वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी जमा केलेले गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, कडधान्य, तेल डबा, टूथपेस्ट, साबण आदी जीवनोपयोगी साहित्य घोडेगाव कोटमदरा येथील साई जनसेवा संस्था या वृद्धाश्रमास मदत म्हणून देण्यात आली. येथील वृद्धाश्रमात दहा पुरुष, चार महिला व चार विद्यार्थी अशा अठरा जणांचा विना मोबादला सांभाळ, संगोपन व पालन पोषण केले जाते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, निलेश संभूस, ज्ञानेश्वर सातव, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे आदी उपस्थित होते. साई जनसेवा संस्थेचे व्यवस्थापक रमेश गायकवाड, योगेश घोडेकर, विलास मोरे आदींनी या मदती बद्दल विकास गोरे व प्रमिला गोरे यांना धन्यवाद दिले.

अतिक्रमण तात्काळ हटविण्याबाबत ग्रामपंचायतची नोटीस

■ कवठे येमाई (दै. संध्या)

अन्यथा नियमानुसार तात्काळ कडक कारवाई



शिरूर तालुक्यातील येमाई गावातील सार्वजनिक रस्ते व शासकीय जागांवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कवठे येमाई ग्रामपंचायतीने नागरिकांना नोटीस दिली आहे.आज दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी ग्रामपंचायतीच्या वतीने ही सूचना (दवंडी) देण्यात आली असून, संबंधित नागरिकांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या नोटिशीनुसार, गावातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर तसेच सार्वजनिक वापराच्या जागांवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.प्राप्त माहिती नुसार ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने संबधीत गटाची मोजणी २९ तारखेला होणार असून कोणी ही अतिक्रमण करू नये अन्यथा कडक कारवाईस सामोरे जाण्याचा इशारा ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आला आहे. संबंधित ठिकाणांचा उल्लेख करण्यात आला आहे. रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवण्याच्या दृष्टीने ही कारवाई प्रस्तावित असल्याचे नोटिशीत नमूद आहे. संबंधित नागरिकांनी आपल्या हद्दीतील अतिक्रमण तातडीने हटवून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे. अन्यथा अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत नियमानुसार कडक व तात्काळ कारवाई करण्यात येऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. गावातील रस्ते वाहतुकीसाठी खुले राहावेत आणि सार्वजनिक जागांचा वापर सुरळीत व्हावा, यासाठी नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासक विस्तार अधिकारी बी आर गावडे,ग्राविकास अधिकारी पूनम थोरात चितलकर व ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

टीएसपीएल ग्रुपच्या एकतीस कर्मचाऱ्यांना गौरव पुरस्कार



■ चाकण (दै. संध्या)

टीएसपीएल ग्रुप मधील एकतीस कर्तृत्ववान कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट कार्याबददल व संस्थेच्या प्रगतीतील योगदानाबद्दल चाकण येथे महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्स पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्राचे माजी मंत्री डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्सचे संस्थापक आदम सैय्यद, टीएसपीएल ग्रुपचे संस्थापक व महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्सचे सहसंस्थापक डॉ. मेहबूब सैय्यद, टीएसपीएल ग्रुपच्या सहसंस्थापिका रुमा सैय्यद आदींच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संचालक सारंग चव्हाण, समृद्धी चव्हाण, बाबासाहेब खिलारी, प्रकाश राठोड आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड्स पुरस्कार लोकेश परदेशी, भारती तटके, गौरी मानकर, योगेश अहिरे, वैभव बर्डे, तुषार निंबाळकर, अजय कधारे, कृतिक खसारे, स्वस्तिक जाधव, राकेश यादव, योगिता झरेकर, निकिता कर्वे, वैष्णवी लवारे, सिया दाहे, चेतन कोंडेकर, सचिन पंडित, पवन वाकोडे, रवी पवार, अफरोज पठाण, सबिया खान, बरखा शेवाळे, करीना पासवान, भूमिका बोबडे, कविता विश्वकर्मा, निकिता सोनवणे, यशस्विनी साळुंके, जय जी पांडे, सोहेल सैय्यद, विनय मिश्रा व यश मतलाने यांना प्रदान करण्यात आला. डॉ. मेहबूब सैय्यद यावेळी म्हणाले," या पुरस्कारामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यात अधिक उत्कृष्टता साध्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. युवकांच्या रोजगार निर्मितीद्वारे महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल." रुमा सैय्यद यांनी सर्वांचे कौतुक केले. समृद्धी चव्हाण यांनी आभार मानले.

जुन्नरच्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

■ जुन्नर (दै. संध्या)

काळ्या फिती लावून आंदोलन
जुन्नर वकील बार असोसिएशनचा पाठिंबा

समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी जुन्नरसह राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज केले. गेल्या २० ते २२ महिन्यांपासून शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा न्यायिक कर्मचारी संघटनांनी दिला आहे. जुन्नर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनीही या आंदोलनात सहभागी होत नियमित कामकाज सुरू ठेवले. सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागणीला जुन्नर वकील बार असोसिएशनने पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे सुधारित वेतनश्रेणीच्या मागणीला स्थानिक पातळीवरही पाठबळ मिळाले आहे. शासनाने प्रस्तावाला तातडीने मंजुरी न दिल्यास नोव्हेंबरमध्ये न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, आता शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कवठे येमाईत युद्धपातळीवर कार्यवाही

१५०० शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण - ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव यांची माहिती

■ कवठे येमाई (दै. संध्या)




शिरूर तालुक्याच्या पश्चिमेकडील कवठे येमाई, मुंजाळवाडी, इचकेवाडी आणि परिसरातील गावांमध्ये पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासकीय दुष्काळी मदत मिळावी, यासाठी महसूल प्रशासनाने पीक पंचनाम्यांच्या कामाला वेग दिला आहे. कवठे येमाई परिसरात सुमारे १,५०० शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण झाले असल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव यांनी दिली.

शिरूर तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागातील पिकांची वाढ खुंटली आहे. पिकांना आवश्यक पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार दुष्काळी मदत मिळावी, यासाठी महसूल विभागाकडून प्रत्यक्ष शेतावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी केली जात आहे. शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मसके यांनी अधिकाधिक दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महसूल यंत्रणा कार्यरत असून, पात्र शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद घेण्याचे काम सुरू आहे. ग्राम महसूल अधिकारी शलाका अशोक भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली कवठे येमाई,इचकेवाडी आणि मुंजाळवाडी परिसरात पंचनाम्यांची कार्यवाही वेगाने सुरू आहे.महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी करत आहेत. नुकसानग्रस्त पिकांची सद्यस्थिती तपासणे, नुकसानीची छायाचित्रे घेणे, आवश्यक माहिती संकलित करणे आणि पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण करणे यावर भर दिला जात आहे. पंचनाम्यांमुळे प्रत्यक्ष नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची नोंद शासनाच्या नियमानुसार करता येणार असून, पुढील मदत प्रक्रियेसाठी आवश्यक माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

पंचनाम्यांसाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

पंचनाम्यांची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून द्यावी. संबंधित शेतकऱ्यांनी महसूल विभागाच्या सूचनांचे पालन करावे आणि आपल्या पिकांच्या नुकसानीची माहिती संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पंचनाम्यांची माहिती संकलित करून पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे. पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार मदत मिळण्याची अपेक्षा आहे. एकूणच, कवठे येमाई परिसरात दुष्काळी पीक पंचनाम्याच्या कामाला वेग आला असून,सुमारे १,५०० शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण झाल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली आहे.आता या पंचनाम्यांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना मदत कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रेमसंबंधाचा भयंकर शेवट! शिक्षकाने प्रेयसी वैशालीची केली हत्या

नागपूर: दैनिक संध्या

प्रेमसंबंधातून झालेल्या एका हत्याकांडाने नागपूर हादरले. एका शिक्षकाने त्यांच्या प्रेयसीची हत्या केली आणि तिचा मृतदेह चंद्रपूर शहरातून आणून नागपूरमधील घरात पुरला. पोलिसांनी मयत महिलेचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर आरोपीला अटक केली. वैशाली विलास टिपले आणि आरोपी शिक्षक संतोष भगवान साखरकर हे दोघेही चंद्रपूर शहरात राहत होते. त्यांच्यामध्ये मागील एका काही काळापासून अनैतिक संबंध होते. मिळालेल्या माहितीनुसार, १४ ऑक्टोबर रोजी संतोष आणि वैशाली यांच्यात भांडण झाले. भांडणाचे कारण अद्याप समोर आलेले नाही. वाद विकोपाला गेला आणि रागात संतोषने वैशालीच्या छातीवर जड वस्तूने वार केला. या हल्ल्यात वैशालीचा जागीच मृत्यू झाला. वैशालीची हत्या केल्यानंतर संतोषने हे प्रकरण लपवण्यासाठी तिचा मृतदेह लपवण्याचे ठरवले. संतोष चंद्रपूरवरून वैशालीचा मृतदेह घेऊन नागपूरला आला. नागपूरमधील हिंगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कान्होली परिसरातील स्वतःच्या घरी त्याने मृतदेह आणला. घरातील एका खोलीत खड्डा खोदला आणि त्यामध्ये वैशालीचा मृतदेह पुरला. वैशाली बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली. पोलिसांनी तपास सुरू केला. वैशालीच्या मोबाईल सीडीआर बघितल्यानंतर पोलिसांना संतोषवर संशय आला. त्यांनी संतोषला ताब्यात घेतले आणि चौकशी केली. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पण, पोलिसांनी त्याला खाक्या दाखवताच त्याने हत्या केल्याची कबुली दिली. चंद्रपूर पोलिसांनी नागपूरमधील हिंगणा पोलिसांना याबद्दलची माहिती दिली. पोलिसांनी आरोपी संतोषच्या घराची झाडाझडती घेतली. पोलिसांनी खोलीत पुरलेला मृतदेह बाहेर काढला. त्यावेळी तो पूर्णपणे कुजला होता. या प्रकरणात पोलिसांनी संतोषला अटक केली असून, पुढील तपास सुरू केला आहे.

'डरपोक' गुन्हेगार लपून वल्गना करतात

नागपूर: दैनिक संध्या

पोलिसांना उघडपणे आव्हान देण्याची हिंमत नसलेले डरपोक गुन्हेगार कुठेतरी लपून बसतात आणि तेथून वल्गना करतात. अशा भाडोत्री गुन्हेगारांना आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या आकांनाही शोधून काढले जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेची पोलिसांनी गंभीर दखल घेतली असून, आरोपींची ओळख पटविण्यात आली आहे. त्यांच्या संदर्भातील महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांना मिळाले असून, आरोपींसह या कटामागील सूत्रधारांचाही शोध घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेबाबत नागपुरात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणाले की, ही घटना निंदनीय असून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. घटनेनंतर रात्रीतूनच आरोपींची ओळख पटविण्यात आली. पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळाले असून आरोपी अल्पवयीन नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोणत्याही परिस्थितीत आरोपींना शोधून काढून कायद्याच्या कचाट्यात आणले जाईल. या गुन्ह्यामागे कोण आहे आणि त्याचा मास्टरमाइंड कोण आहे, याचाही शोध घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

कंटेनरची धडक, तीन तरुण जागीच ठार

जळगाव : दैनिक संध्या

आते भावाला जळगाव येथे सोडून झुरखेडा (ता. धरणगाव) येथे परतणाऱ्या तरुणांच्या कारचा व कंटेनरचा अपघात होऊन ३ जण जागीच ठार झाले. हा भीषण अपघात रविवारी (१८ ऑक्टोबर) रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास जळगावनजीक बांभोरी पुलावर झाला. पंकज प्रकाश चौधरी (३०), रवींद्र अरुण चौधरी (३०), हरीश हिम्मत चौधरी (३२) सर्व रा. झुरखेडा, ता. धरणगाव अशी मयतांची नावे आहेत. रवींद्र चौधरी व हरीश चौधरी यांच्या काकांचा रविवारी झुरखेडा येथे दशक्रिया विधी असल्याने यासाठी सर्व नातेवाईक आलेले होते. हा विधी झाल्यानंतर रात्री रवींद्र व हरीश हे दोघे चुलत भाऊ त्यांच्या आते भावाला सोडण्यासाठी कारने जळगावला आले होते. रात्री जळगाव येथून हे दोघे व पंकज चौधरी असे तिघेजण झुरखेडा येथे जात होते. त्यावेळी बांभोरी पुलावर कार व कंटेनर यांची धडक झाली. यात तिघांना गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील, पाळधी आऊट पोस्टचे प्रभारी भूषण कोते यांच्यासह सहकारी पोहोचले. त्यांनी तिघही जणांना गंभीर अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील यांनी भेट दिली. बायपास खचल्यामुळे या मार्गावरील वाहतूक गेल्या अडीच महिन्यांपासून जळगाव शहरातून वळविण्यात आली आहे. त्यामुळे महामार्गावर एकापाठोपाठ अपघात सुरूच आहे. रविवारीदेखील एक कंटेनर जळगाव शहराकडे येत असताना अपघात झाला व तीन तरुणांना जीव गमवावा लागला.

जयपूर रग्सच्या वार्षिक विशेष सेलमध्ये ६० टक्क्यांपर्यंत सूट



नवी दिल्ली : दैनिक संध्या

हाताने विणलेल्या गालिच्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या जयपूर रग्सने वार्षिक विशेष सेल २०२६ जाहीर केला आहे. या सेलमध्ये ग्राहकांना विविध आकर्षक रचना, पारंपरिक कलाकुसर आणि उत्कृष्ट विणकाम असलेल्या गालिच्यांवर ६० टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमातून मिळणाऱ्या उत्पन्नातील काही भाग ग्रामीण मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सायकल निधीला दिला जाणार आहे. यंदाच्या सेलच्या माध्यमातून जयपूर रग्सने खरेदीच्या अनुभवाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली आहे. ग्रामीण भागातील अनेक मुलींना शाळेत जाण्यासाठी लांबचे अंतर पायी पार करावे लागते. अशा परिस्थितीत सायकल उपलब्ध झाल्यास त्यांचा प्रवास अधिक सुलभ होऊ शकतो. वेळेची बचत, प्रवासातील अडचणी कमी करणे आणि शिक्षणातील सातत्य टिकवणे यासाठी सायकल महत्त्वाची ठरू शकते. जयपूर रग्सचे व्यवस्थापकीय संचालक योगेश चौधरी म्हणाले, "अनेकदा साध्या गोष्टींमधूनही अर्थपूर्ण बदल घडू शकतो. शहरांमध्ये आपण अनेक सुविधांचा सहज वापर करतो; मात्र ग्रामीण भारतातील अनेक मुलींसाठी सायकलचा अभाव हा शिक्षणाच्या मार्गातील मोठा अडथळा ठरू शकतो. एखाद्या मुलीच्या प्रवासातील हा अडथळा दूर करण्यासाठी आपण थोडीशी मदत करू शकलो, तर गालिच्याची खरेदीदेखील एका मोठ्या सामाजिक बदलाचा भाग बनू शकते. व्यवसायाने केवळ आपल्या घरांना आणि राहण्याच्या जागांना सुंदर बनवण्यापुरते मर्यादित न राहता, समाजातील लोकांच्या जीवनातही सकारात्मक मूल्य निर्माण केले पाहिजे, असा आमचा विश्वास आहे."

प्रचाराचा 'सूपर संडे'! पदवीधरांच्या मतांसाठी फडणवीसांची दिवसभर मोर्चेबांधणी, कोहळेंच्या प्रचारासाठी सभा, संवादांवर भर

■ नागपूर (दै. संध्या)



विधानपरिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिवसभर विविध घटकांशी संवाद साधला. उद्योजकांपासून प्राध्यापकांपर्यंत, अधिवक्त्यांपासून फार्मासिस्ट आणि डॉक्टरांपर्यंत विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींशी संवाद साधत त्यांनी पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला. यंदा भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली असून प्रचाराच्या सुपर संडेत मुख्यमंत्र्यांनीच प्रचाराची धुरा खांद्यावर घेतल्याचे दिसून आले.

दिवसभरातील विविध संवादांच्या माध्यमातून मुख्यमंत्री फडणवीस यांनी पदवीधर मतदारांच्या व्यावसायिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रश्नांवर सरकारची भूमिका मांडली. त्यामुळे कोहळे यांच्या प्रचारात केवळ राजकीय आवाहनांऐवजी विविध क्षेत्रांतील घटकांशी थेट संवाद साधण्यावर महायुतीने भर दिल्याचे चित्र दिसले. मुख्यमंत्र्यांनी दक्षिण-पश्चिम नागपूरमधील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रांतील प्रश्न समजून घेत त्यावर सरकारची भूमिका मांडण्याचा प्रयत्न या संवादांमधून करण्यात आला. विद्यापीठ शिक्षण मंचाच्या वतीने हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजित प्राध्यापक संवाद मेळाव्यात फडणवीस यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे कोणाच्याही नोकऱ्या जाणार नाहीत, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली. प्राध्यापकांच्या पदभरतीचा प्रश्न, कार्यभार निश्चिती, पदोन्नती, तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे मानधन, शिष्यवृत्ती वितरण आणि विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदान या विषयांवर मेळाव्यात सविस्तर चर्चा झाली. प्राध्यापकांच्या समस्या ऐकून घेताना फडणवीस यांनी संबंधित विषयांवर योग्य निर्णय घेण्याची ग्वाही दिली. यावेळी उमेदवार सुधाकर कोहळे, शिक्षण मंचाच्या अध्यक्षा डॉ. कल्पना पांडे, माजी आमदार अनिल सोले, संदीप जोशी, गिरीश देशमुख, डॉ. संजय दुधे, डॉ. सतिश चाफले, डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. सुभाष कोंडावार, डॉ. योगेश भुते, डॉ. अजय अग्रवाल, डॉ. पांडुरंग डांगे, डॉ. हेमंत देशमुख आणि डॉ. राजेंद्र गंजीवाले प्रामुख्याने उपस्थित होते.महाविद्यालयांमधील रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने ५,०१२ प्राध्यापक पदांच्या भरतीला तातडीने मंजुरी देण्यात आली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे कार्यभारात वाढ झाली असून, कार्यभार निश्चिती आणि पदसंख्येबाबत सर्व प्रवर्गांसाठी स्पष्ट धोरण जाहीर करून शासन आदेश काढण्यात येतील. सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकांच्या पदोन्नतीतील प्लेसमेंटचा लाभ देय तारखेपासून मिळावा, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लाभ द्यावेत, या मागण्यांवर संबंधित अधिकारी आणि शैक्षणिक संघटनांची बैठक घेण्याचे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले.

ग्राहकांच्या अभिप्रायातून घडतोय एआय प्लस स्मार्टफोनचा अनुभव

■ मुंबई : (दै. संध्या)

- उत्पादन सुधारणा आणि सेवांवर भर
- कॅमेरा, जोडणी आणि कार्यक्षमतेतील सुधारणांसाठी ग्राहकांच्या सूचनांचा वापर
- लाँचपूर्व चाचण्या आणि तत्पर विक्रीपश्चात सेवेला प्राधान्य

ग्राहकांच्या प्रत्यक्ष अनुभवांना उत्पादन विकास आणि सेवा सुधारणांशी जोडत एआय प्लस स्मार्टफोनने ग्राहककेंद्रित दृष्टिकोन अधिक बळकट केला आहे. ग्राहकांची परीक्षणे, दैनंदिन वापरातून मिळणारा अभिप्राय आणि विक्रीपश्चात संवाद यांच्या आधारे कंपनी कॅमेऱ्याची स्थिरता, जोडणी आणि उपकरणाची कार्यक्षमता यांसारख्या बाबींमध्ये सुधारणा करण्यावर भर देत आहे. यासाठी सॉफ्टवेअर अद्यतने, अधिक कठोर चाचण्या आणि ग्राहक सहाय्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

ग्राहकांच्या अनुभवातून मिळणाऱ्या सूचनांचा केवळ आढावा न घेता त्यांचे प्रत्यक्ष सुधारणांमध्ये रूपांतर करण्याची भूमिका कंपनीने स्वीकारली आहे. ग्राहकांसाठी तंत्रज्ञान विकसित करण्याबरोबरच त्यांच्या सहभागातून अधिक चांगली उत्पादने घडवण्याच्या बांधिलकीचे हे प्रतिबिंब असल्याचे कंपनीने म्हटले आहे. एआय प्लस स्मार्टफोनच्या विविध उपकरणांना रचना, कॅमेऱ्याची क्षमता, बॅटरीची टिकाऊ क्षमता, कार्यक्षमता आणि किमतीच्या तुलनेत मिळणारे मूल्य यांसाठी सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे कंपनीने नमूद केले आहे. 'नोव्हा २ निओ ५जी'ला बॅटरीची कामगिरी आणि वापरण्यातील सुलभतेसाठी चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'नोव्हा २ पॉवर ५जी'च्या एकूण वापरानुभवाची आणि दोन रंगछटांच्या आकर्षक रचनेची, विशेषतः 'ब्लू फ्युजन' रंगाची, ग्राहकांनी प्रशंसा केली आहे. 'नोव्हा २ अल्ट्रा ५जी'ला छायाचित्रणाचा अनुभव, कार्यक्षमता आणि अमोलेड प्रदर्शनासाठी पसंती मिळाली आहे.

माणगाव येथील अल्पवयीन मुलीच्या खूनप्रकरणी दोषीला फाशी द्या

■ कोल्हापूर : (दै. संध्या)



हातकणंगले तालुक्यातील माणगाव येथे १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. घटनेनंतर आरोपी फरार झाला आहे. या पार्श्वभूमीवर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी कोल्हापूर दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विमानतळावर भेट घेऊन दोषींना तात्काळ कठोर शिक्षा करण्याची मागणी केली.

राजू शेट्टी यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "माणगाव येथील निष्पाप आणि अल्पवयीन स्वरा उपाध्ये हिची झालेली हत्या अत्यंत दुर्दैवी आणि हृदयद्रावक आहे. या अघोरी आणि पाशवी कृत्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. समाजात कायद्याचा कोणताही धाक उरलेला नाही, हेच या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. यामुळे या प्रकरणाचा तपास पोलिसांनी वेगाने आणि सखोल पद्धतीने करावा व या नराधमांविरोधातील हा खटला 'फास्ट ट्रॅक कोर्टात' चालवून त्याचा तात्काळ न्यायनिवाडा करावा. पीडित स्वरा आणि तिच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली. या घटनेची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ पावले उचलली आहेत. त्यांनी विशेष पोलिस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा आणि जिल्हा पोलिसप्रमुख निलोत्पल यांना या प्रकरणाचा तपास अत्यंत वेगाने करून दोषींवर कडक आणि तातडीने कायदेशीर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीमध्ये सरस्वती पूजनाचा सोहळा उत्साहात संपन्न

■ पुणे : (दै. संध्या)



सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी, पुणे येथे शनिवारी सरस्वती पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञान, विद्या, बुद्धी आणि संस्कार यांचे प्रतीक असलेल्या देवी सरस्वतीचे पूजन करून यावेळी आदरभाव व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी, सिंबायोसिस चे संस्थापक व अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार आणि सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे तसेच सिंबायोसिस युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्स, इंदोरच्या कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांच्या हस्ते सरस्वतीमातेचे पूजन करण्यात आले. देवी सरस्वतीचे मंगलमय रूप, महाकालीचा रुद्रावतार, पश्चिम बंगालमधील पारंपरिक धुनुची नृत्य आणि महिषासुरमर्दिनी स्तोत्राच्या सादरीकरणातून भक्ती, संस्कृती आणि कलेचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून नवदुर्गांचा जागर केला. विविधरंगी वेशभूषा आणि प्रभावी कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सौ. संजीवनी मुजुमदार, संचालिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्यूझीयम व मेमोरिअल; डॉ. विद्या येरवडेकर, कुलपती, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी; डॉ. राजीव येरवडेकर, प्रोव्होस्ट, वैद्यकीय व आरोग्य विज्ञानशाखा, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी; एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त), माजी उपवायुसेनाप्रमुख; एअर कमोडोर प्रमोद पुराणिक (निवृत्त), उपाध्यक्ष, भारत फोर्ज; श्री. अनंत रंजन, वरिष्ठ व्यवस्थापन व्यावसायिक; मेजर सोनाली कदम (निवृत्त), संचालक, एससीडीएल; आशिष लिमगिरे, कुलसचिव, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी आणि शरद पुलाटे, कुलसचिव, एससीडीएल व इतर मान्यवर उपस्थित होते.

अंशुल सिंघल यांच्याकडून व्हॅन्ट्रॉक रिअल ॲसेट्सची स्थापना

■ मुंबई : (दै. संध्या)



रिअल इस्टेट क्षेत्रात संस्थात्मक व्यासपीठ उभारण्याचा दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले ज्येष्ठ व्यावसायिक अंशुल सिंघल यांनी 'व्हॅन्ट्रॉक रिअल ॲसेट्स प्रायव्हेट लिमिटेड' या नव्या मालमत्ता विकास आणि व्यवस्थापन व्यासपीठाची सुरुवात केली आहे. प्रारंभी वेअरहाउसिंग, औद्योगिक मालमत्ता आणि लॉजिस्टिक्स पार्क्सच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. मुंबईत मुख्यालय असलेल्या या कंपनीने सुमारे १ कोटी १५ लाख चौरस फूट क्षेत्र विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, या प्रकल्पांचे पूर्णत्वानंतरचे एकूण विकासमूल्य सुमारे ४,२०० कोटी रुपये असणार आहे.

या विकास योजनेतील पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, बंगळुरू आणि पुणे येथे सुमारे ३० लाख चौरस फूट क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पांचे अंदाजित विकासमूल्य सुमारे १,१०० कोटी रुपये असून, बांधकाम २०२७ मध्ये सुरू करण्याचे आणि २०२८ पासून भाडे उत्पन्न मिळवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांसाठी जमिनीच्या वाटाघाटी, कागदपत्रांची पूर्तता आणि नियामक मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया विविध टप्प्यांवर आहे. उर्वरित सुमारे ८५ लाख चौरस फूट क्षेत्र राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, बंगळुरू, पुणे आणि मुंबई महानगर प्रदेशात विकसित करण्याची योजना आहे. हे प्रकल्प पुढील १२ ते १८ महिन्यांत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचा कंपनीचा मानस आहे. ग्रेड-ए दर्जाच्या वेअरहाउसिंग आणि औद्योगिक पार्क्सच्या विकासासाठी कंपनी मोक्याच्या ठिकाणांवरील जमिनींवर लक्ष केंद्रित करणार आहे. शहरी भागांजवळील अशा ठिकाणांवर सुमारे १५ ते ६० एकरांचे भूखंड विकसित केले जाणार असून, प्रत्येक ठिकाणी ४ लाख ते १५ लाख चौरस फुटांपर्यंत विकासक्षमता असेल.

देशातील निर्णय रस्त्यांवर नव्हे, संसदेतच होणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांच्या आंदोलनांवर घणाघात

■ नागपूर:(दै. संध्या)

लोकशाहीत सत्ताबदल घडवायचा असेल, तर तो निवडणुकीच्या माध्यमातूनच घडवावा लागेल. त्यासाठी लोकांची मने जिंकावी लागतील. भारताच्या संविधानाला नाकारून नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका आणि पाकिस्तानप्रमाणे सत्ताबदल घडविण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांची ती पूर्ण होणार नाहीत. देशातील निर्णय संसदेत होतील, रस्त्यांवर निर्णय होणार नाहीत, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आंदोलनांवर घणाघात केला. नागपुरात रविवारी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे हे शिवसेनेतील सत्ताबदल थांबवू शकले नाहीत, तर दुसऱ्या कोणत्या सत्ताबदलाबाबत बोलत आहेत, हे मला माहिती नाही. त्यांच्या पक्षाने हिंदुत्व आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले, तेव्हा पक्षात वादळ आले. बाळासाहेबांच्या विचारांवर चालणाऱ्यांनी खरी शिवसेना उभी केली. त्यांच्यासारख्या लोकांनी भारताच्या संविधानाशी लढणे बंद केले पाहिजे. लोकशाहीत निवडणुकीच्या माध्यमातूनच सत्ताबदल होऊ शकतो. संविधान नाकारून अन्य देशांप्रमाणे सत्ताबदल घडविण्याचा विचार करणाऱ्यांची स्वप्ने पूर्ण होणार नाहीत; उलट अशा लोकांचे उद्देश संविधानच समाप्त करेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नागपूर पदवीधर मतदारसंघात सुधाकर कोहळे यांना दुसऱ्या पसंतीच्या मतांपर्यंत जाण्याची गरज पडणार नाही. ते पहिल्या पसंतीच्या मतांच्या कोट्यावरच विजयी होतील.

अमरावतीमध्ये किरण सरनाईक हे महायुतीचे उमेदवार असून, भाजप त्यांच्या पाठीशी आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात डॉ. स्मिता जाधव या महायुतीच्या उमेदवार असून, संपूर्ण महायुती त्यांच्या पाठीशी आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही बैठक घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना कामाला लावले आहे. पुणे शिक्षण मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत असली, तरी महायुतीमध्ये बेबनाव नाही. पाचही जागा महायुतीच जिंकेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाविकास आघाडीवर टीका करताना फडणवीस म्हणाले की, महाविकास आघाडी सुरुवातीपासूनच विभाजित आहे. त्यांच्यात गटातटाचे राजकारण मोठ्या प्रमाणावर आहे. याउलट महायुती एकसंघपणे काम करीत आहे. नागपुरात सर्व पक्ष ज्या पद्धतीने एकत्रितपणे काम करताना दिसत आहेत, तसे चित्र महाविकास आघाडीत दिसत नाही, असे ते म्हणाले.

थोडक्यात पण महत्वाचे



स्त्रीचा सन्मान करणारा समाज राज्य करतो

- साहित्यिक मातृशक्ती सन्मानाने महिला साहित्यिकांचा गौरव
- नवा विष्णू चौक नवरात्र उत्सव मित्र मंडळाच्या वतीने आयोजन

पुणे : दैनिक संध्या

मृत्यूसाठी अनेक गोष्टी असल्या, तरी जन्म देण्याची शक्ती एकाच ठिकाणी आहे, ती म्हणजे आई. तिच्या माध्यमातून समाजाची उभारणी होते. समाजाच्या जडणघडणीत स्त्रीचे योगदान महत्त्वाचे आहे. ज्या समाजात स्त्रीचा सन्मान केला जातो, तो समाज जगावर राज्य करतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यवाह सुनेत्रा मंकणी यांनी केले. स्व. द. मा. मिरासदार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नवा विष्णू चौक नवरात्र उत्सव मित्र मंडळाच्या वतीने साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल 'साहित्यिक मातृशक्ती सन्मान २०२६' या पुरस्काराने महिला साहित्यिकांचा गौरव करण्यात आला. यावेळी मंकणी बोलत होत्या. प्रा. संगीता हेमंतराजे मावळे यांची विशेष उपस्थिती होती. त्यासोबतच मंडळाचे कार्याध्यक्ष कुमार रेणुसे, चारुलता मानापुरे,पल्लवी सोनगुल , वैशाली सुरगुडे, पूनम गांधी उपस्थित होते. प्रा. संगीता मावळे म्हणाल्या, स्त्री ही बीजापासून ब्रह्मांडापर्यंतचा प्रवास घडवते. स्त्रीने स्वतःला कमी समजू नये. आपल्या सभोवतालचे जग प्रकाशित करण्यासाठी प्रत्येक स्त्री प्रयत्नशील असते. या वेळी डॉ. अंजली जोशी, प्रिया जोग, विनिता देशपांडे, डॉ. मृणालिनी जमदग्नी, स्वाती वैद्य, सुषमा हिरेकुरुर, माधुरी जोशी, रुपाली भुसारी आणि डॉ. नयना कासखेडीकर या महिला साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. माधुरी जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मृणालिनी दुसाने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांनी आभार मानले.



गॅलेक्सी स्कूल येथे नवरात्रोत्सव व कन्या पूजन उत्साहात साजरे

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

गॅलेक्सी स्कूल येथे नवरात्रोत्सवा निमित्त कन्या पूजनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लहान मुलींना देवीचे रूप मानून त्यांचे पूजन करण्यात आले. त्यांना औक्षण करून प्रसाद देण्यात आला. तसेच मुलींनी पारंपरिक वेशभूषेत दांडिया खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमादरम्यान मुलींचे महत्त्व, स्त्रीशक्ती आणि समाजातील मुलींचे स्थान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. मुलींना समान संधी, शिक्षण आणि आदर मिळणे किती महत्त्वाचे आहे, हेही समजावून सांगण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे खजिनदार निलेश गुळुंजकर व शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा गुळुंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, श्रद्धा, समानतेची भावना आणि मुलींबद्दल आदरभाव वाढीस लागला.

म्हाडा कॉलनीच्या पुनर्विकासासाठी रामदास आठवले यांची मध्यस्थी



पुणे : दैनिक संध्या

येरवडा येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाच्या म्हाडा कॉलनीतील सर्व्हे क्रमांक १९१-अ मधील सुमारे ४० वर्षे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची मुंबई येथे भेट घेतली. या इमारतींच्या पुनर्विकास प्रक्रियेला गती देऊन ती फास्ट ट्रॅकवर पूर्ण करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, शाम सदाफुले, निलेश रोकडे, सुनील गवळी, रवी अवसरमल आणि अक्षय अवसरमल उपस्थित होते.

महावितरण गणेशखिंड मंडलाचा ग्राहकाभिमुख उपक्रम

६४१ कामांचा निपटारा; ३०० ग्राहकांना मोबाईल ॲपचे मार्गदर्शन

■ पुणे (दै. संध्या)

ग्राहकांना तत्पर, सुलभ आणि प्रभावी सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महावितरणच्या गणेशखिंड मंडळात 'सेवा सेतू–सेवा संकल्प अभियानांतर्गत' विशेष ग्राहकाभिमुख मोहीम राबविण्यात आली. अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कोथरूड, शिवाजीनगर, पिंपरी आणि भोसरी या चार विभागांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. या मोहिमेत सुट्टीच्या दिवशीही महावितरणचे अधिकारी व कर्मचारी विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये प्रत्यक्ष पोहोचून ग्राहकांच्या प्रलंबित कामांचा निपटारा केला.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या परिसरातच महावितरणच्या सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. ग्राहकांना छोट्या कामांसाठी कार्यालयात वारंवार जाण्याची गरज भासू नये, या उद्देशाने पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध वॉर्ड कार्यालयांमध्ये सेवा स्टॉल उभारण्यासोबतच गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही विशेष मोहीम राबविण्यात आली. रविवार, दि. ११ ऑक्टोबर आणि शनिवार, दि.१७ ऑक्टोबर रोजी सुट्टीच्या दिवशीही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सेवा दिली.

या मोहिमेत ऐश्वर्यम कम्फर्ट गोल्ड, प्राईड वर्ल्ड सिटी, चऱ्होली, मंगलम लाईफ सोसायटी, मोशी, गोदरेज स्कायलाइन, पुनावळे, जी.के. आर्यन, रावेत, ५७ मिडटाऊन, शाश्वत ४५, वृंदावन संकुल, सिल्व्हेनिया, जिजाई नगरी, काकडे सिटी, दोडके प्लाझो, हिमगौरी, कृष्णकुंज, अरुणाली, महेश पॅराडाईज, गंगा लिजेंड यांसह विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ग्राहकांना सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या मोहिमेदरम्यान २५१ ग्राहकांच्या नावांमध्ये बदल करून नोंदी अद्ययावत करण्यात आल्या. १८९ ग्राहकांच्या वीजबिलावरील पत्त्यांमध्ये दुरुस्ती करण्यात आली, तर १६० ग्राहकांचे मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी महावितरणच्या प्रणालीमध्ये अद्ययावत करण्यात आले. तसेच ४१ ग्राहकांची चुकीची वीजबिले दुरुस्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण ६४१ ग्राहकांच्या कामांवर कार्यवाही करण्यात आली. याशिवाय, ३०० ग्राहकांना महावितरणचे मोबाईल ॲप डाउनलोड करणे आणि त्याचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचण्यास मदत झाली. सोसायटीच्या परिसरातच सेवा उपलब्ध झाल्याने प्रलंबित कामे पूर्ण करणे अधिक सोयीचे झाले. तसेच मोबाईल ॲपच्या वापराबाबत मार्गदर्शन मिळाल्याने ग्राहकांना डिजिटल माध्यमातून महावितरणच्या विविध सेवा घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. सुट्टीच्या दिवशीही सोसायट्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून ग्राहकांना सेवा देण्याच्या महावितरणच्या पुढाकाराबद्दल ग्राहकांनी समाधान व्यक्त केले.

सेवा संकल्प अभियान दृष्टीक्षेप

- ग्राहकांच्या नावात बदल : २५१
- वीजबिलावरील पत्त्यात दुरुस्ती : १८९
- मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत : १६०
- चुकीची वीजबिले दुरुस्त : ४१
- मोबाईल ॲप डाउनलोड व मार्गदर्शन : ३००



आळंदी पालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस द्या

■ आळंदी (दै. संध्या)

- नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे यांचे प्रशासनाला निवेदन; दिवाळीपूर्वी बोनस देण्याची मागणी

आळंदी नगरपरिषदेच्या विविध विभागांत कंत्राटदारांमार्फत कार्यरत असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त नियमानुसार बोनस मिळावा, अशी मागणी नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन सादर केले असून, कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. नगरपरिषदेच्या स्वच्छता, कचरा संकलन, पाणीपुरवठा, अग्निशमन, विद्युत व्यवस्था, कार्यालयीन कामकाज तसेच विविध देखभाल सेवांमध्ये कंत्राटी कर्मचारी प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे काम करतात. तीर्थक्षेत्र आळंदीतील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासह पालिकेचे दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्यात या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांनाही आर्थिक दिलासा मिळणे आवश्यक आहे. वर्षभर शहराच्या सेवेत योगदान देणाऱ्या कामगारांच्या कष्टांची दखल घेऊन त्यांना नियमानुसार मिळणारा हक्काचा बोनस वेळेत देणे गरजेचे असल्याचे कुऱ्हाडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

झेंडूंच्या फुलांनी चाकण बाजारपेठ बहरली

■ चाकण (दै. संध्या)

उच्चांकी आवक होऊनही भाव तेजीत

देशभरात आणि विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात खंडेनवमी साजरी करण्यात आली. तर मंगळवारी साडेतीन मुहुर्तापैकी एक असलेल्या दसऱ्याचा सण आहे. या दोन्ही महत्त्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्ड मधील उप बाजारात झेंडूच्या फुलांची विक्रमी आवक झाली. चाकण बाजारपेठ झेंडूच्या फुलांनी बहरली असून, संपूर्ण परिसर फुलून गेला आहे. बाजारपेठ पूर्णपणे पिवळी धमक दिसू लागली आहे. दसऱ्याच्या दिवशी घराघरांमध्ये, वाहनांवर, दुकानांवर आणि कार्यालयांमध्ये झेंडूच्या फुलांच्या माळा व देव देवतांची पूजा करण्याची मोठी परंपरा आहे. खंडेनवमीमुळे शस्त्र, हत्यारे आणि वाहनांच्या पूजेसाठी झेंडूला प्रचंड मागणी होती. या मागणीची पूर्तता करण्यासाठी खेड तालुक्यासह आसपासच्या ग्रामीण भागातील शेकडो शेतकऱ्यांनी आपला शेतमाल चाकण बाजारात विक्रीसाठी आणला होता, असे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक व व्यापारी रवींद्र बोराटे व धनंजय बोराटे यांनी सांगितले. झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर झाली असली, तरी भाव तेजीत आहेत. बाजारात झेंडूच्या फुलांना चांगली मागणी असून, प्रतवारीनुसार झेंडूला प्रति किलो साठ रुपये ते १०० रुपये असा दर मिळत आहे. सणासुदीचे दिवस असल्याने दर वाढले असले तरी खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. यंदाच्या हंगामात पावसाची स्थिती आणि इतर कारणांमुळे फुल उत्पादक शेतकरी चिंतेत होते. मात्र, खंडेनवमी व दसऱ्याच्या मुहूर्तावर बाजारात झेंडूला मिळालेला उच्चांकी भाव आणि झालेली तुफान उलाढाल यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद झळकत आहे. चाकण बाजारपेठेतून पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह विविध परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणावर फुलांची घाऊक व किरकोळ उलाढाल होत असून, संपूर्ण बाजारपेठेत उत्सवाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाश्वत सौर ऊर्जेच्या वापरात महाराष्ट्र प्रगतीपथावर : गोपाल काबरा

सौर ऊर्जा प्रसारासाठीच्या 'सौर संवाद २०२६' यात्रेचा समारोप

■ पुणे (दै. संध्या)

"पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे, अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढविणे आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना देणे, ही काळाची गरज आहे. शाश्वत सौर ऊर्जेच्या वापरात महाराष्ट्र प्रगतीपथावर असून, सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार, उद्योजकता आणि आर्थिक विकासाच्या नव्या संधी निर्माण होत आहेत," असे मत 'जीके एनर्जी'चे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागात सौर ऊर्जेचा वापर वाढल्यास ऊर्जा बचतीबरोबरच स्थानिक पातळीवर कौशल्यविकास आणि स्वयंरोजगारालाही चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

सौर ऊर्जेचा प्रसार, या क्षेत्रातील व्यावसायिक संधींची माहिती आणि ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सौर संवाद २०२६' यात्रेचा समारोप रविवारी पुण्यातील खराडी येथील मेफील्ड इस्टेटमध्ये झाला. १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान यात्रेद्वारे महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जेविषयी संवाद साधण्यात आला. अहिल्यानगर येथून सुरु झालेली ही यात्रा संभाजीनगर, नाशिक, धुळे, बुलढाणा, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, वाशीम, नांदेड, लातूर, सोलापूर, कोल्हापूरमार्गे फिरून पुण्यात यात्रेचा समारोप झाला. गोपाल काबरा म्हणाले, "सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी नागरिक, शेतकरी, उद्योजक आणि स्थानिक व्यावसायिकांपर्यंत या तंत्रज्ञानाची माहिती पोहोचविणे आवश्यक आहे. सौर ऊर्जा हा केवळ वीज निर्मितीचा पर्याय नसून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे सौर ऊर्जेचा स्वीकार वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती आणि तंत्रज्ञानाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. यात्रेद्वारे सौर ऊर्जेच्या वापराचे फायदे तसेच या क्षेत्रातील व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात या यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला."

"येत्या काळात एक हजारांहून अधिक उद्योजकांना सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न असून, घरगुती छतावरील (रुफटॉप) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती देण्यात आली. तसेच विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांसाठी स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले," असे काबरा यांनी यावेळी सांगितले.



भारत महासत्ता होण्यासाठी शेतीला तंत्रज्ञानाची जोड द्यायला हवी

अनिल घनवट यांचेप्रतिपादन; 'शेअर क्रॉपर्स'तर्फे तीन डिजिटल प्लॅटफॉर्मचे लोकार्पण, 'एफपीओ'ना पाच ट्रॅक्टरचे वितरण

■ पुणे (दै. संध्या)



"सरकारने शेतकऱ्यांच्या थाळीतून ओढून घेणे थांबवायला हवे. तरच शेतकरी सक्षम होईल आणि देश महासत्ता व्हायला वेळ लागणार नाही. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज देणे, शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे आणि शेतीमालाला चांगला भाव मिळेल यासाठी सरकारी यंत्रणेने प्रयत्न करायला हवेत. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांनी उत्पादन क्षमता वाढवायला हवी," असे प्रतिपादन शेतकरी नेते अनिल घनवट यांनी केले.

पुण्यातील 'शेअर क्रॉपर्स'च्या वतीने पहिल्या टप्प्यात तीन डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये 'स्वयंपूर्ण गाव विकास प्रकल्प', 'खेत नायक' आणि 'किसान नायक' या ॲपचे अनिल घनवट यांच्या हस्ते लोकार्पण झाले. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे झालेल्या कार्यक्रमावेळी स्वतंत्र भारत पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सीमा नारोडे, वृत्ती ग्रुपचे संस्थापक वीरेंद्र जमदाडे, 'फिनसो'चे संस्थापक दीपक शुक्ला आणि राहुल पाटील, तसेच शेअर क्रॉपर्सचे संस्थापक संजय खत्री, सहसंस्थापिका कृष्णा भट, सुधा ज्योती, दिपिका खत्री आदी उपस्थित होते. यावेळी 'मशिनरी ऑन फ्युएल कॉस्ट' या उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (एफपीओ) भागीदारांना पाच ट्रॅक्टर वितरित करण्यात आले. अनिल घनवट म्हणाले, "शहरांतील विविध प्रकारच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. यातील बहुतांश समस्या या शेतीशी जोडलेल्या आहेत. शेतकरी खूश असेल तर सगळेच आलबेल राहील. कृषीप्रधान देशाचा शेतकरी गरीब राहिला तर देशाचा विकास होणार नाही. शेतकरी सतत यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करत असतो. मात्र त्याचे यश हे व्यापारी, निसर्ग, सरकार यांच्या हाती असते. असे होऊ नये आणि शेतकऱ्याचे भवितव्य हे त्याच्या हाती राहावे याद्दष्टीने या तंत्रज्ञान प्रणाली उपयुक्त ठरतील. या तंत्रज्ञानामुळे शेतीचा खर्च कमी करणे, कर्ज किंवा विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सगळ्यात महत्त्वाचे पीक व्यवस्थापनाबाबत अधिक अचूक निर्णय घेणे शक्य होणार आहे."

सीमा नरोडे म्हणाल्या, "शेतकऱ्यांना आपली माहिती देणे सुरक्षित वाटणे हे यातील आव्हान आहे. मात्र ही प्रणाली पारदर्शकपणे काम करत असून यातून कंपनीचा कोणताच फायदा नाही. उलट यामुळे शेतकऱ्यांचाच फायदा होणार आहे. विविध गोष्टींचे रेकॉर्ड मेंटेन करण्याबरोबरच शेतीसाठी आवश्यक असणारा खर्च कमी करण्यासाठी, बॅलन्स शीट तयार करण्यासाठी, नुकसान भरपाई मिळवण्यासाठी तसेच विम्यासाठीही या माहितीचा उपयोग होणार आहे."

विरेंद्र जमदाडे म्हणाले, "शेतकऱ्यांना सतत विविध समस्यांचा सामना करावा लागतो. मात्र त्यांचे काम थोड्या प्रमाणात सोपे व्हावे यासाठी शेअर क्रॉपर्सने सामाजिक जाणीवेतून हा प्रयत्न केला आहे. एखादे पीक घेताना त्यावर किती खर्च करायचा याची नेमकी मांडणी शेतकऱ्यांना या करता येणार आहे. तसेच आपण पिकवलेल्या मालाची किंमत आपण ठरवणेही यामुळे सोपे होणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि फायदा करुन घ्यावा."

कृष्णा भट यांनी प्रास्ताविकात या तंत्रज्ञानाविषयी सांगितले की, या प्रणालीमध्ये शेतजमीन, प्लॉट, पेरणी, पीकनिहाय माहिती, बियाणे व खतांची खरेदी, मजुरी, फवारणी, यंत्रसामग्री, सिंचन, उत्पादन, विक्री तसेच नफा-तोटा यांची सोप्या पद्धतीने नोंद ठेवता येणार आहे. त्यामुळे शेतीसंबंधी विविध माहिती आणि कागदपत्रे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याऐवजी ती एकाच डिजिटल व्यवस्थेत उपलब्ध होतील. " यावेळी कर्नाटकमधील तीन, बिहार व महाराष्ट्रातील प्रत्येकी एक एफपीओंना ट्रॅक्टर भेट देण्यात आले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात शेतकरी, शेतकरी मित्र, एफपीओ, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध संस्था यांना या ॲप्लिकेशनचा प्रत्यक्ष वापर कसा करायचा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शेतकऱ्यांचा संपूर्ण डेटा एका क्लिकवर

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि पात्रतेच्या याद्यांमधील नोंदी यांसाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि माहितीवर आधारित करण्यासाठी शेअर क्रॉपर्सने डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांची जमीन, पिके, पेरणी, उत्पादन, खर्च आणि नुकसानीसंबंधी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. अनेकदा शेतकऱ्यांना नावाची नोंद झाली आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये बऱ्याच फेऱ्या माराव्या लागतात. पण ही प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीविषयक नोंदींचे डिजिटल स्वरूपात एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. या प्रणालीमध्ये शेतजमीन, प्लॉट, पेरणी, पीकनिहाय माहिती, बियाणे व खतांची खरेदी, मजुरी, फवारणी, यंत्रसामग्री, सिंचन, उत्पादन, विक्री तसेच नफा-तोटा यांची सोप्या पद्धतीने नोंद ठेवता येणार आहे. त्यामुळे शेतीसंबंधी विविध माहिती आणि कागदपत्रे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याऐवजी ती एकाच डिजिटल व्यवस्थेत उपलब्ध होतील. या माहितीच्या आधारे शेतीचा खर्च कमी करणे, कर्ज किंवा विम्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि सगळ्यात महत्त्वाचे पीक व्यवस्थापनाबाबत अधिक अचूक निर्णय घेणे शक्य होणार आहे.